पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ७ • सोमवार, दि. १३ जुलै २०२६ •मूल्य ५ •पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

आवड आणि आत्मविश्वास असेल तर कुठलीही गोष्ट अवघड नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोट शहरात अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी

संपर्क

पवन बेलसरे

तालुका प्रतिनिधी

+91 7057706764

## »थोडक्यात

### काटेपुर्णात जलसाठ्याकडे सर्वांचे लक्ष

**अकोला:**अकोला पाटबंधारे विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यातील प्रमुख जलप्रकल्पांमधील पाणीसाठ्यात अत्यंत संथ गतीने वाढ होत आहे. गेल्या २४ तासांत धरण क्षेत्रात पावसाची नोंद झालेली नसली तरी, या हंगामातील आतापर्यंतच्या पावसामुळे धरणांमधील जलसाठा काही प्रमाणात वाढला आहे. अकोलेकरांना पाणी पुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात १६ दशलक्ष घनमीटर इतका जलसाठा आहे. तो धरणाच्या साठवणीच्या अठरा टक्के इतका आहे. तेल्हारा तालुक्यातील वान प्रकल्पात उपयुक्त साठा ३४ दशलक्ष घनमीटर आहे. तो धरणाच्या साठवण क्षमतेच्या ४१ टक्के इतका आहे. पातूर च्या मोर्णा प्रकल्पात १८दशलक्ष घनमीटर जलसाठा आहे.

## एस.एस. जीन भूखंड घोटाळा; नगर विकासची चौकशी सुरू, पण....

# इतर विभागांच्या 'महा'पापांचे काय ?

## महसूल, भूमी अभिलेख आणि टाऊन प्लॅनिंगच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह?

प्रतिनिधी १३ जुलै

**अकोला:** शहरातील बहुचर्चित 'एस.एस. जीन' येथील कोट्यवधी रुपयांच्या शासकीय भूखंड घोटाळा आणि टीडीआर गैरवापर प्रकरणी राज्याच्या नगर विकास विभागाने चौकशीचे आदेश दिल्याने खळबळ उडाली आहे. मात्र, केवळ महापालिका किंवा नगर विकास विभागाची चौकशी या प्रकरणाच्या मूळाशी जाण्यासाठी पुरेशी आहे का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण घोटाळ्यात महसूल विभाग, भूमी अभिलेख आणि नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने 'अर्थ'पूर्ण डोळेझाक केल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.केवळ महानगरपालिकेच्या चौकशीने या घोटाळ्याचा तिढा सुटणार नाही. यामध्ये महानगरपालिका, भूमी अभिलेख आणि उपजिल्हाधिकारी (महसूल) या तिन्ही विभागांची मिळून एक संयुक्त उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे.



### भूमी अभिलेखचा 'अजब' उद्योग

या संपूर्ण प्रकरणात भूमी अभिलेख विभागाची कार्यपद्धती सर्वात जास्त संशयाच्या भोवऱ्यात आहे. गेल्या सहा ते आठ वर्षांत या जागेवर किती वेळा गुंठेवारी मंजूर झाली आणि किती वेळा जमिनीचे 'सम्मीलीकरण' करण्यात आले, याचा कोणताही स्पष्ट हिशोब नाही. चर्चेनुसार, भूमी अभिलेख विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने नझुलच्या जागेवर गुंठेवारीचा मोठा उद्योग चालवला गेला. या प्रक्रियेत मूळ नकाशांमधील ओपन स्पेस (मोकळी जागा), रस्ते आणि पब्लिक युटिलिटीच्या (सार्वजनिक सोयी-सुविधा) जागा चक्क गायब करण्यात आल्या. रस्ते अरुंद करून तिथे नवीन प्लॉट पाडले गेले आणि त्यांची विक्रीही करण्यात आली.

### कोट्यवधींचे फ्लॅटधारक संकटात; रहिवाशांचा वाढला बीपी

या सर्व शासकीय अनागोंदीचा आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा फटका आता मात्र सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. ज्या मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय नागरिकांनी आपल्या आयुष्याची पुंजी लावून येथे कोट्यवधींचे फ्लॅट आणि बंगले खरेदी केले, त्यांचे धाबे दणाणले आहेत. जर उद्या चौकशीत ही जमीन पूर्णपणे सरकारी (नझुल) निघाल्यास किंवा गुंठेवारी बेकायदेशीर ठरल्यास आपल्या हक्काच्या घरावर बुलडोझर फिरणार का, या भीतीने रहिवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

### इंडस्ट्रियलचे थेट गुंठेवारी ? नियम धाब्यावर !

शासकीय नियमांनुसार, कोणत्याही औद्योगिक जमिनीचा वापर बदलून तो रहिवासी होतो. त्यानंतर तिथे रीतसर लेआऊट टाकणे बंधनकारक असते. जर ती जमीन शासकीय लीजची (नझुल) असेल, तर ती मुळात शासनाला परत मिळणे आवश्यक होते. परंतु, एस.एस. जीनच्या '२९ ए' या भूखंडावर कोणताही कायदेशीर लेआऊट न टाकता, थेट गुंठेवारी लागू करण्यात आली. 'डायरेक्ट ऑफ टाऊन प्लॅनिंग'ने औद्योगिक जमिनीचे रहिवासी भागात रूपांतर न करता ही गुंठेवारीची परवानगी कशी दिली ? महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या सेक्शन ४४ (कलम ४४) अंतर्गत अकृषक परवानगीची तपासणी कोणी केली ? या प्रक्रियेत तत्कालीन उपजिल्हाधिकारी (महसूल) आणि उपविभागीय अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून त्यांची चौकशी कोण करणार, हा मुख्य प्रश्न आहे.

### शिट नंबर २९ ए जमिनीच्या तातडीच्या 'ऑडिट'ची गरज !

एस.एस. जीनच्या २९ ए मधील औद्योगिक क्षेत्र, रहिवासी क्षेत्र, भाडेपट्ट्याची जमीन, रस्त्यांची एकूण जमीन आणि ओपन स्पेस यांची एकत्रित गोळाबेरीज नेमकी किती होते, याचे भूमी अभिलेख आणि महसूल विभागाकडून तात्काळ विशेष ऑडिट करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. गेल्या ८ वर्षांतील अधीक्षक आणि उपअधीक्षकांच्या आदेशांची फाईल उघडल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे. उपलब्ध जमीनीपेक्षा अतिरिक्त जमीनीची विक्री तर केल्या गेली नाही ना अशी विचारणा आता होत आहे.

## राम मंदिर चोरी प्रकरण: सर्वोच्च न्यायालयाने रिपोर्ट मागितला!

वृत्तसंस्था १३ जुलै

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अयोध्या राम मंदिरात अर्पण केलेल्या देणग्यांच्या (चढाव्याच्या) चोरीप्रकरणी उत्तर प्रदेश सरकार, केंद्र सरकार आणि 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट' यांना नोटीस बजावली. न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारकडून या प्रकरणाचा सद्यस्थिती अहवाल मागवला असून,त्यात एसआयटीच्या तपास अधिकाऱ्यांच्या तपशीलाचाही समावेश करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या प्रकरणाशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, सद्यस्थितीचा अहवाल बंद लिफाफ्यात सादर केला जाईल. त्यावर न्यायालयाने स्पष्ट केले की, अहवालात एसआयटीची रचना आणि त्यातील सदस्यांविषयीची सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. त्यानंतर, न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जुलै रोजी निश्चित केली. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर तीन स्वतंत्र याचिकांवर सुनावणी सुरू होती. या याचिकांमध्ये तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणी करण्यासोबतच, मंदिराच्या देणगी व्यवस्थापनाशी संबंधित विविध पैलूंचा आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## वारीतील वाहनानेच वारकऱ्यांना चिरडले!

# 3 जणांचा मृत्यू; 15 जखमी

प्रतिनिधी १३ जुलै

**जेजुरी** : आषाढी एकादशीला पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनसाठी राज्यभरातून पालख्या निघाल्या आहेत. या आषाढी वारीला गालबोट लावणारी एक घटना सोमवारी सकाळी घडली आहे. जेजुरीत वारकऱ्यांच्या भीषण अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. या दुर्दैवी घटनेत तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर १५ ते १६ वारकरी जखमी असल्याची माहिती आहे. ज्या ट्रकने वारकऱ्यांना उडवले तो ट्रक वारकऱ्यांचे सामान वाहून नेणारा होता. या अपघातानंतर घटनास्थळी



मोठा गोंधळ निर्माण झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी परिसरातील भोंगळे मळा वारकऱ्यांचा अपघात झाला. यावेळी एका ट्रकने वारकऱ्यांच्या टेम्पोला धडक दिल्याचे समजते. यामध्ये १५ ते १६ वारकरी जखमी झाले होते. हे वारकरी ज्ञानोबा माऊलींच्या पालखीसोबत जात असताना हा प्रकार घडला. यापैकी तीन महिलांचा मृत्यू झाला असून आणखी काही वारकऱ्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. ज्ञानोबा माऊलींची पालखी काल जेजुरी मुक्कामी होती. सासवडचा मुक्काम संपल्यानंतर आज पालखी जेजुरीत येणार आहे. आज सकाळी वारकऱ्यांनी जेजुरीच्या दिशेने चालायला सुरुवात केली होती.

## घरचे लोक बाहेर जाणं योग्य नाही

### राष्ट्रीय नेतृत्वाने निर्णय घ्यावा, खडसेंच्या योगदानाचा केला उल्लेख!

प्रतिनिधी १३ जुलै

**नागपूर** : भाजप पक्ष वाढवण्यात गेल्या ४० वर्षात अनेक नेत्यांचे योगदान लाभले आहे. त्यापैकी एकनाथ खडसे एक आहेत. ४० वर्षे त्यांनी भाजपच्या विस्तारासाठी काम केले. काही चुका झाल्या असतील, म्हणून अमित शहा यांनी काही चर्चा केली असती तर मला माहीत नाही. नेते-कार्यकर्ते जीव लावून काम करत होते. काळाच्या ओघात काही घटना घडल्या आणि ते पक्षाच्या बाहेर गेले. आपल्या घरचे लोक बाहेर जाणं योग्य नाही. त्यांना परत पक्षात घ्यायचे का नाही, याबद्दल राष्ट्रीय नेतृत्वाने निर्णय



घ्यावा, असे वक्तव्य भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ते सोमवारी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस केंद्रात जाणार असल्याच्या चर्चांबाबतही बोलले. त्यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस सर्वाधिक काळ राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत.

### महाराष्ट्र भाजपच्या कोअर कमिटीची आज बैठक

महाराष्ट्र भाजपच्या कोअर कमिटीची आज बैठक होत आहे. मुख्यमंत्री फडणवीसांच्या वर्षा निवासस्थानी रात्री आठ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, पंकजा मुंडे, राधाकृष्ण विखे पाटील व इतर नेते बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तसेच भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार विनोद तावडे आणि खासदार अशोक चव्हाणही कोअर कमिटी बैठकीला हजेरी लावणार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळातील संभाव्य विस्तार, राज्यातील संघटनात्मक बाबी, रखडलेल्या नियुक्त्यासह पक्ष विस्ताराच्या मुद्यावर बैठकीत चर्चा होईल.

## खोदकामादरम्यान आढळला 'हँड ग्रेनेड'

**अकोला:** शहरातील मारुती नगर परिसरात नालीच्या खोदकामादरम्यान एक हँड ग्रेनेडसदृश (बॉम्बसारखी) वस्तू आढळल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलिस, स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांचे



बॉम्ब शोधक व नाशक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मारुती नगर भागातील रहिवासी अजूभाऊ झामरे यांच्या घरासमोर नालीचे खोदकाम सुरू होते. खोदकाम सुरू असताना ही वस्तू कामगारांच्या लक्षात आली नाही. मात्र, काम संपल्यानंतर नालीतील काढलेला माल (माती व कचरा) गोळा करत असताना कामगारांना हँड ग्रेनेडसारखी एक संशयास्पद वस्तू दिसून आली.






# बाजीप्रभू देशपांडे यांच्या अतुलनीय पराक्रमाची अन् बलिदानाची साक्ष देणारी पावनखिंड!



पावनखिंड (पूर्वीचे नांव घोडखिंड) ही महाराष्ट्रात पन्हाळगड आणि विशाळगड यांच्यामधील रस्त्यावर असलेली खिंड आहे. अतिशय अवघड व अरुंद असलेली ही खिंड या दोन्ही किल्ल्यांमधील अंतर कमी करते. दोन उंच डोंगरांच्यामध्ये असलेल्या या खिंडीतील वाट इतकी अरुंद आहे, येथून एकावेळी फक्त एक 'घोडेस्वार' पार जाऊ शकतो. हत्ती, मेणे किंवा इतर वाहनांनी ही खिंड पार करणे अशक्य आहे, यामुळे या खिंडीला घोडखिंड असे नाव होते.

१३ जुलै, १६६० रोजी पन्हाळगडाला पडलेल्या वेढ्यातून निसटून निघालेले शिवाजी महाराज विशाळगडाकडे जात असताना सिद्दी मसूदच्या सैन्याने त्यांना येथे गाठले. तेव्हा झालेल्या निकराच्या लढाईत बाजी प्रभू देशपांडे, त्यांचे भाऊ फुलाजी देशपांडे व त्यांच्यासह मोजक्या सैनिकांनी ही खिंड जबरी लढवली व आदिलशाही सैन्याला थोपवून धरले, यामुळे शिवाजी महाराजांना विशाळगड गाठणे शक्य झाले. यांत बाजी प्रभू देशपांडे भावंडे फुलाजी व त्यांच्यासह मागे थांबून शेवटचा एल्गार करणाऱ्या त्यांच्या बव्हंश सैन्याने मरण पत्करले. त्यांच्या या बलिदानाची आठवण म्हणून या खिंडीला पावनखिंड असे नाव दिले गेले.

इ.स.२ मार्च १६६० रोजी सिद्दी जोहरने पन्हाळयास वेढा दिला होता यावेळी छत्रपती शिवाजीराजे पन्हाळा किल्ल्यावर अडकून पडले होते. मुसळधार पावसात सुद्धा सिद्दी वेढा सोडावयास तयार नव्हता. या कठीण प्रसंगी महाराजांनी सिद्धीस तहाचा निरोप धाडला त्यामुळे सिद्धी गाफील राहिला. शिवा काशीद नावाच्या मावळ्याने छत्रपतींच्या वेशात सिद्दी जौहर यास तहाची बोलणी करण्यात गुंतवून छत्रपतींना पन्हाळ्याहून निसटण्यास पुरेसा अवधी दिला. शिवा काशीदचे खरे रूप कळल्यावर सिद्धीने त्यांस ठार केले, तोवर छत्रपती विशाळगडाच्या वाटेवर होते. छत्रपती शिवरायांनी पन्हाळ्यावरून, विशाळगडाकडे पलायन केल्याचे समजल्यानंतर, सिद्दीने, सिद्दी मसूदला छत्रपतींच्या मागावर पाठवले व त्यांचा पाठलाग चालू झाला. मसूदच्या सैन्याने मराठ्यांना घोडखिंडीत गाठले, अशावेळी बाजीप्रभूंनी छत्रपतींना विशाळगडावर पोहोचून तोफानी इशारा करत नाहीत तोवर ही खिंड लढवली जाईल असे सांगितले. घोडखिंडीतील अतिशय चिंचोळ्या वाटेमुळे मराठ्यांनी मसूदच्या सैनिकांची कत्तल आरंभली, शरीराला असंख्य जखमा झाल्या असतानाही बाजीप्रभू, फुलाजी, संभाजी जाधव, बांदल यांनी मोठा पराक्रम गाजविला. महाराज विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफांचा गजर झाला. इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूने तोफांचा आवाज ऐकल्यानंतरच समाधानाने आपला जीव सोडला.या युद्धात मराठ्यांचे जवळपास सर्वच ३०० मावळे कामी आले तर मसूदचे जवळपास ३००० सैनिक मारले गेले. बाजीप्रभू व इतर मावळ्यांच्या पराक्रमाने घोडखिंड पावनखिंड म्हणून इतिहासात अमर झाली.

पावनखिंडीच्या लढाईचा उल्लेख शिवकालीन ऐतिहासिक कागदपत्रात सापडत नाही. शिवभारतप्रमाणे ही लढाई विशाळगडच्या पायथ्याशी गजापूरच्या घाटात झाली. तरी पण त्यामुळे बाजी प्रभू, फुलाजी आणि बांदल सेनेचा पराक्रम अजिबात कमी होत नाही. त्यांचे शौर्य आणि बलिदान अलौकिक आहे.

## 'लाख मेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे,'

पावनखिंडीतील लढाई ही मराठी इतिहासातील एक महत्वाची लढाई मानली जाते. ही लढाई १३ जुलै १६६० रोजी विशाळगडानजीक पावनखिंड अथवा घोडखिंड येथे झाली. पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून शिवाजी महाराज विशाळगडाकडे कूच करत होते. आदिलशाही सेनेला त्याचा सुगावा लागला व शिवाजी महाराजांच्या मागे आदिलशाही सेनेचा पाठलाग चालू झाला. जेव्हा महाराज व त्यांचे साथीदार घोडखिंडीत पोहोचले त्यावेळेस बाजीप्रभू देशपांडे यांनी महाराजांना विनंतीवजा आदेश दिला की, शिवाजी महाराजांनी पुढे गडावर जावे व जोवर महाराज गडावर पोचत नाहीत तोवर बाजी ही खिंड लढवतील व शत्रूला तिथेच रोखून धरतील. 'लाख मेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे,' असे बाजीप्रभूंनी महाराजांना विनवले.

अशा लढाईला युद्धशास्त्रात लास्ट स्टँड मानले जाते. आदिलशाही फौजेचे नेतृत्त्व सिद्दी जौहरकडे होते. त्याला सिद्दी मसूद व फाजल खान (अफझलखानाचा मुलगा) यांची साथ होती. जौहरची एकूण फौज १०,००० ची होती तर महाराजांसोबत फक्त ३०० ते ६०० मावळे होते. महाराजांनी पौर्णिमेच्या रात्री गडावरुन उतरून वेढा तोडला व विशाळगडाकडे कूच केले. महाराजांनी आपल्यासारख्याच दिसणाऱ्या शिवा काशिद नावाच्या व्यक्तीला पाठीमागे ठेवले.

जेव्हा जौहरला शिवाजी महाराज विशाळगडाकडे गेले आहेत, असा सुगावा लागला तेव्हा त्याने सिद्दी मसूदला महाराजांच्या मागावर पाठवले व त्यांचा पाठलाग चालू झाला.

काही वेळाने महाराज व साथीदार घोडखिंडीत पोहोचले तेव्हा पाठलाग करणारे मसूदचे सैनिक जवळच आहेत, याची जाणीव झाली व काही वेळातच ते गाठतील आणि महाराजांसोबत इतरांना पकडतील असा अंदाज होता. घोडखिंडीत अतिशय चिंचोळी वाट होती. एकावेळेस एक-दोन जणच रांगेतून जातील एवढी. बाजीप्रभूंनी महाराजांना स्थिती समजावून विशाळगडावर प्रस्थान करण्याची विनंती केली. शिवाजी महाराजांनी पुढे विशाळगडावर प्रयाण केले. खिंडीत मसूदचे सैनिक पोहोचल्यावर त्यांना मावळ्यांच्या आडव्या रांगेचा सामना करावा लागला. मावळ्यांच्या मागील रांगांनी तसेच आजूबाजूच्या कड्यांवर चढून दगड गोट्यांची बरसात चालू केली. अतिशय चिंचोळ्या वाटेमुळे केवळ एक दोनच सैनिक मराठ्यांच्या रांगेपर्यंत पोहोचत व मारले जात अशा प्रकारे मराठ्यांनी मसूदच्या सैनिकांची कत्तल आरंभली. बाजीप्रभूंच्या आवेशाने अनेकांची गाळण उडवली. मसूदने बंदुकधाऱ्यांना कड्यावर चढून बाजीप्रभूंवर गोळीबार करण्याचा आदेश दिला. बाजींवर गोळ्या झाडण्यात आल्या. बाजीप्रभू जखमी झाले तरी त्यांनी सैनिकांना कोणत्याही परिस्थितीत आपली जागा सोडू नका, असे बजावले. काही वेळातच शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचले. त्यांनी तोफांचा गजर दिला. इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूंनी तोफांचा गजर ऐकल्यानंतरच कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने आपला जीव सोडला.

## श्रीसंत वासुदेव महाराजांची पायीवारी
### भक्ती, आरोग्य, पर्यावरण आणि विज्ञानाचा संगम



टाळ-मृदंगाच्या मंजुळ निनादात, विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि "राम कृष्ण हरी... ज्ञानोबा-तुकोबा..."च्या भक्तिमय वातावरणात निघालेली श्री संत वासुदेव महाराजांची 'पंढरपूरची आरोग्यदायी वारी' आज केवळ धार्मिक परंपरा न राहता निरोगी समाज, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जनचळवळ ठरत आहे.

दि. २६ जून रोजी श्रीक्षेत्र श्रद्धासागर, अकोट येथून प्रारंभ झालेली ही वारी तब्बल ६५० किलोमीटरचा प्रवास करीत २५ दिवसांत श्रीक्षेत्र पंढरपूर गाठणार आहे. या प्रवासात सहभागी वारकरी दररोज किमान २५ ते ३० किलोमीटर पायी चालण्याचा संकल्प पूर्ण करत आहेत. हा प्रवास केवळ पंढरीच्या विठ्ठल भेटीचा नसून, शरीर, मन आणि समाज यांना सुदृढ करण्याचा एक सामूहिक संकल्प ठरत आहे.

पहाटे सहा वाजता श्री संत वासुदेव महाराजांच्या दर्शनाने दिवसाची सुरुवात होते. त्यानंतर हरिनामाच्या गजरात वारकरी उत्साहाने मार्गक्रमण करतात. दुपारच्या सत्रात प्रवचन, तर सायंकाळी कीर्तनाच्या माध्यमातून अध्यात्माबरोबरच व्यसनमुक्ती, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता, स्वच्छता, आरोग्य आणि वैज्ञानिक विचारांचा संदेश २५ प्रवचने , कीर्तनाद्वारे दिला जात आहे. त्यामुळे ही वारी श्रद्धेला विवेकाची जोड देणारी ठरत आहे. यंदाच्या वारीत सुमारे ३०० महिला-पुरुष, युवक-युवती, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले आहेत. विविध वयोगटांतील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग हा या उपक्रमावरील समाजाच्या विश्वासाचा पुरावा मानला जात आहे.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, नियमित २५ ते ३० किलोमीटर चालल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते, मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांचा धोका कमी होतो, स्नायू व सांधे सक्षम राहतात तसेच मानसिक ताण कमी होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते. अशा प्रकारे ही वारी अध्यात्मासोबत आरोग्यशास्त्राचाही प्रभावी संदेश देत आहे. या पालखी सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वारी मार्गावरील गावांमध्ये करण्यात येणारे वृक्षारोपण अभियान. "एक वारकरी – एक वृक्ष" या भावनेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भक्तिबरोबरच पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

अनेक सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी या अभिनव संकल्पनेचे स्वागत केले असून, "भक्तिबरोबर आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी ही वारी काळाची गरज आहे," अशा शब्दांत या उपक्रमाचे कौतुक व्यक्त केले आहे. या पंढरपूरची आरोग्यदायी वारीचे आयोजन श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट यांच्या वतीने करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महल्ले, उपाध्यक्ष माधवराव ठाकरे, विश्वस्त गजानन दुधाळ, अनिल कोरपे, व्यवस्थापक ह भ प अंबादास महाराज मानकर तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी आणि स्वयंसेवक हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

भक्तिला आरोग्याची जोड, अध्यात्माला विज्ञानाची साथ, पर्यावरणाला कृतीची दिशा आणि समाजाला सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणा देणारी पंढरीची वारी 'आरोग्यदायी वारी' ही आजच्या काळातील वारी परंपरेची एक अभिनव आणि अनुकरणीय ओळख बनत आहे. या पायदळवारीने परभणी जिल्हा पार करून पंढरपूरकडे निघाली आहे.

**गजानन हरणे,**
वारकरी, खडकी अकोला
मोबाईल नंबर..9822942623

## 'सिंहासन' गाजविणारा अभिनयाचा अनभिषिक्त सम्राट!



निळू फुले यांचा आज स्मृतिदिन

आपल्या अस्सल अभिनयाने मराठीसह हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजविणारे निळू फुले यांचा आज, जुलै १३ जुलै हा स्मृतिदिन. २००९ मध्ये त्यांच्या निधनामुळे मराठी सिनेमात एक पोकळी निर्माण झाली होती. आजही त्यांचे नाव घेताच खलनायक निळू फुले आठवल्याशिवाय राहत नाहीत. त्यांनी चित्रपटात बहुतांश खलनायकाच्या भूमिका केल्या असल्या तरी ते अभिनयाचे खरे हीरो होते.कथा 'अकलेच्या कांद्याची' या लोकनाट्याद्वारे निळू फुले यांनी पदार्पण केले. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोबत काम केलेले आहे.

निळू फुले यांचा जन्म १९३० मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे वडील लोखंड आणि भाजी विकून मिळणाऱ्या पैशावर चरितार्थ चालवत असत. निळू फुलेंनी मॅट्रिकपर्यंतच शिक्षण घेतले. पण, आपली अभिनयाची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी स्वतः 'येरा गबाळ्याचे काम नोहे' हा वग लिहिला. त्यानंतर पु. ल. देशपांडे यांच्या नाटकात 'रोंगे'ची भूमिका साकारून त्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. मात्र 'कथा अकलेच्या कांद्याची' या वगनाट्यातील भूमिकेमुळे ते कलाकार म्हणून खऱ्या अर्थाने पुढे आले. नाटक आणि सिनेमा या दोन्ही क्षेत्रात निळूभाऊंनी स्वतःचा ठसा उमटवला. नायक आणि खलनायक अशा दोन्ही भूमिका करणाऱ्या निळूभाऊंचे ग्रामीण आणि शहरी जीवनाचे निरीक्षण अतिशय अचूक होते. या निरीक्षणाचा त्यांनी अभिनयात खुबीने उपयोग केला. सहज सुंदर अभिनय करणाऱ्या निळूभाऊंनी काल्पनिक कथेतला कलाकार जिवंत केला. नाट्य रसिक आणि सिने प्रेमींना कलाकार म्हणून अत्यंत प्रिय असलेले निळू भाऊ समाजवादी विचारधारेशी जोडलेले होते. निळूभाऊंनी राष्ट्र सेवा दलाचा कार्यकर्ता म्हणून समाजाची सेवा केलेली आहे. ते समाजवादी विचारवंत नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचाराने प्रेरित होते. मुळातच नास्तिक असलेल्या फुलेंनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती संघटनेसाठी अंधश्रद्धा विरोधी प्रबोधन, सत्याग्रह, आंदोलनात सक्रिय सहभाग दिला आहे. स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतरही पिढी घडविणारी राष्ट्रीय संघटना असलेल्या राष्ट्र सेवा दलाच्या कला पथकाचे सदस्य राहिलेले निळू फुले यांनी १९५८ च्या सुमारास पुण्यातील कला पथकाचे नेतृत्व केले.

निळू फुले यांचे १३ जुलै २००९ रोजी पहाटे दोनच्या सुमारास निधन झाले. अन्ननलिकेच्या कर्करोगाने अंथरुणाला खिळून असलेल्या निळू फुले यांची प्रकृती खालावल्याने त्यांना पुण्यातील जहांगीर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

निळू फुले यांनी 'कथा अकलेच्या कांद्याची' या लोकनाट्याद्वारे रंगमंचावर पदार्पण केले. 'एक गाव बारा भानगडी' या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले, आणि सलग ४० वर्षे या चित्रपटसृष्टीत व रंगभूमीवर कारकीर्द केली. निळू फुले यांनी १२ हिंदी चित्रपटांत भूमिका केल्या आहेत, तर मराठी भाषेतल्या जवळपास १४० चित्रपटांमधून काम केले आहे. त्यांच्या भूमिकांपैकी 'चोरीचा मामला', 'पुढचं पाऊल', 'शापित', 'सामना', 'सिंहासन' यांतील भूमिका विशेष गाजल्या. कथा अकलेच्या कांद्याची, कुणाचा कुणाला मेळ नाही, पुढारी पाहिजे, बिन बियाचे झाड, मी लाडाची मैना तुमची, राजकारण गेलं चुलीत, लवंगी मिरची कोल्हापूरची वगैरे त्यांचे गाजलेले लोकनाट्य आहेत. तसेच गाजलेले मराठी चित्रपटांमध्ये आयत्या बिळावर नागोबा, एक गाव बारा भानगडी, एक रात्र मंतरलेली, एक होता विदुषक, गल्ली ते दिल्ली, चटक चांदणी, चांडाळ चौकडी, चोरीचा मामला, जन्मठेप, जैत रे जैत, नाव मोठं लक्षण खोटं, पिंजरा, पैज,फटाकडी, बन्याबापू, बिन कामाचा नवरा, भन्नाट भानू, भिंगरी, भुजंग, राघुमैना, शापित, सामना, सिंहासन, सोंगाड्या तसेच गाजलेले हिंदी चित्रपटात कुली, जरा सी जिंदगी, दिशा, दुनिया, नरम गरम, प्रेम प्रतिज्ञा, मशाल, सारांश, सौ दिन सास के तर गाजलेली नाटकं जंगली कबूतर, बेबी, रण दोघांचे, सखाराम बाईंडर, सूर्यास्त. त्यांच्या अभिनयामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासनातर्फे अभिनयासाठी सलग ३ वर्षे - इ.स. १९७२, इ.स. १९७३ आणि इ.स. १९७४ मध्ये पुरस्कार मिळाले आहेत. राष्ट्रपतींच्या हस्ते साहित्य संगीत अकादमीचा पुरस्कार (१९९१), 'सूर्यास्त' या नाटकाकरिता नाट्यदर्पण हा पुरस्कार, जयंतराव टिळक जीवनगौरव पुरस्कार (२००८)

## पाणी बचत: काळाची गरज

'जल हेच जीवन आहे' हे वाक्य आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. माणसाला जगण्यासाठी हवेनंतर सर्वात महत्त्वाची कोणती गोष्ट असेल, तर ती म्हणजे पाणी. परंतु, आजच्या आधुनिक आणि औद्योगिकीकरणाच्या युगात पाण्याचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. वाढती लोकसंख्या, प्रदूषण आणि बदलते हवामान यामुळे अनेक भागांत तीव्र पाणीटंचाई निर्माण होत आहे. म्हणूनच, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. पाणी बचतीची सुरुवात आपण स्वतःपासून आणि आपल्या घरापासून करू शकतो. दैनंदिन जीवनात छोट्या-छोट्या सवयी बदलून मोठ्या प्रमाणावर पाणी वाचवता येते. उदाहरणार्थ: ब्रश करताना किंवा भांडी घासताना नळ चालू न ठेवता, गरजेनुसारच पाणी वापरावे. वाहत्या नळाखाली वाहने धुण्याऐवजी बादलीत पाणी घेऊन ती स्वच्छ करावीत. घरातील नळ किंवा पाईप गळत असल्यास त्याची त्वरित दुरुस्ती करावी, कारण थेंब-थेंब गळणारे पाणी महिन्याला शेकडो लिटर वाया घालवते. कपडे आणि भांडी धुतलेले पाणी फेकून न देता, त्याचा वापर झाडांना देण्यासाठी किंवा स्वच्छतागृहामध्ये करावा. पातळीसोबतच सामाजिक आणि शेती क्षेत्रातही पाणी बचतीचे प्रयत्न आवश्यक आहेत.

# एस.आय.आर. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षा द्यावी

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया अकोला जिल्ह्यासह राज्यभर होत आहे. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत अकोला जिल्ह्यात घराघरात गणना पत्रकांचे वितरण वेगाने सुरू आहे. आज १२ जुलै २०२६ ला सकाळी शिवसेना वसाहत या भागात गणना प्रपत्र वाटप व संकलन करीत असतांना पथकातील यादी भाग क्रमांक १९८ वरील सहाय्यक श्रीमती शैला नारखेडे ह्यांना परिसरातील मोकाट गाईने जोरदार धडक दिली व त्या रोडवर कोसळून पडल्या त्यामुळे त्यांना पाठीला मुका मार लागला. त्यांची प्रकृती सद्या ठिक असली तरी सदर घटना फार दुर्दैवी घडली आहे, राज्य सरकारने एस. आय. आर. चे काम सुरू केले असून सदर काम पूर्ण करण्यासाठी शिक्षक कर्मचाऱ्यासह अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, आशा वर्कर व इतर कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश केला आहे. मागील आठवड्यात पश्चिम महाराष्ट्र मधे एस.आय.आर चे काम करीत असतांना हृदय विकारांचा झटका आल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्या होत्या.



एस.आय.आर. काम पूर्ण करण्यासाठी सदर कर्मचारी सकाळी सात वाजता पासून संध्याकाळपर्यंत अविरत काम करीत आहेत. ११ जुलै च्या अहवालानुसार जिल्ह्यात एकूण १५ लाख ९५ हजार ६४४ मतदारांपैकी १४ लाख ११ हजार ५७७ म्हणजे ८८.४६ टक्के मतदारांपर्यंत गणना पत्रके पोहोचली आहेत. त्यापैकी २ लाख ५१ हजार ३३९ म्हणजे १५.७५ टक्के पत्रकांचेच डिजिटायजेशन पूर्ण झाले आहे. पुढील काळात कर्मचाऱ्यांना हे राहीलेले काम पुर्ण करावयाचे आहे. सदर काम करीत असताना कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व जीवनाविषयी प्रश्न निर्माण झाले आहेत, असे अपघात घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर कर्मचारी आपली नौकरी चे काम सांभाळून देशाचे काम करीत आहेत. हे कर्मचारी सामाजिक, आर्थिक व मानसिक विवंचनेतून काम पुर्ण करीत आहेत. राज्य शासनाने या सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षा देण्यात यावी, जनेकरून योग्यरीत्या काम पूर्ण करेल, अशी चर्चा कर्मचाऱ्यामधे होत आहे.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात** अकोला मो. ९८२२६७४४८७

# नामस्मरण एक अद्भुत साधना

नामस्मरणाने खरोखर एवढे चमत्कार होतात का तर निश्चित्तच चमत्कार म्हणु अशा घटना आपल्या आयुष्यात घडतात. सर्वप्रथम आपण अबोल होतो. एकांताची आवड निर्माण होते. बहुतेक संतांची चरित्रे वाचल्यावर आपल्या हेच लक्षात येईल. ते सुरुवातीला एकांतात होते. समाजापासुन अलिप्त रहात होते. साधना पुर्ण झाल्यावरच त्यांनी लोकांत मिसळायला सुरुवात केली.

सुरुवातीला डोक्यामध्ये विचारांची खुप गर्दी होते. इतके दिवस षड्रिपु आपल्या मनात ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्यावर नामस्मरणाने हल्ला होतो. ते आपली जागा सोडू लागतात. मनात विचारांची गर्दी होणे, हे चांगले लक्षण आहे. काही साधकांना ही पायरी कळत नाही. ते घाबरुन नामस्मरण करणे सोडून देतात.

काही दिवसांनी झोपेतही जप चालू होतो. जप वैखरीतून मध्यमा वाणीत आल्याचे ते लक्षण आहे. शांत झोप लागते. वेळेवर जागही येते. पशु पक्षीही साधकांना घाबरत नाहीत. साधना योग्य दिशेने जाते, हे समजण्याचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. स्वप्नात अतृप्त आत्मे येत नाहीत. नामस्मरणाने साधकाच्या सभोवती एक संरक्षक कवच तयार झालेले असते, त्यामुळे आत्म्यांना प्रवेश मिळत नाही. राग येत नाही. हे ही साधना व्यवस्थित चालल्याची खुण आहे. नामस्मरण करुनही तुम्हाला राग येत असेल तर तुम्ही नीतीनियम पाळण्यामध्ये कमी पडता, असाच त्याचा अर्थ होतो. क्रमाक्रमाने कुंडली शुद्ध होत जाते. त्या अनुषंगाने घटना घडत जातात. नामस्मरण हे ग्रहांवरही मात करणारे आहे. कुंडलीतल्या प्रत्येक स्थानाला नाव आहे. उदा. प्रथम स्थान हे स्वभाव स्थान, द्वीतिय स्थान हे धनस्थान, तृतीय स्थान हे पराक्रम स्थान वगैरे. साधकाची प्रगती होत गेल्यावर कुंडलीतली स्थाने शुद्ध होत गेली की त्याप्रमाणेच अनुकूल घटना घडू लागतात. आश्चर्य म्हणजे सर्वसामान्य लोकांनी ऐहिक सुखासाठीच सुरुवातीला नामस्मरणाची कास धरलेली असते, पण जशी साधना पुढे जात रहाते, तशी त्यांची वासना कमी कमी होत जाते. ३ वर्षांपुर्वी नामस्मरणावर मी लिहिलेली वरील पोस्ट फक्त २ ग्रुप्समध्ये पोस्ट केली होती. त्यावर मी नावही टाकले नव्हते. अर्ध्या तासानंतर हीच पोस्ट छान नामाचा साज चढवुन माझ्याकडे परत आली आणि मला सोशल मिडियाचे महत्त्व कळले. अजुनही ही पोस्ट थोड्या थोड्या दिवसांच्या अंतराने माझ्यापर्यंत येते. कधी त्यामध्ये श्री स्वामी समर्थ हे नाम असते, तर कधी श्रीराम जयराम जय जय राम असते, तर कधी दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा हे नाम असते. वर उल्लेख केलेले नामस्मरणाचे लाभ हे खुप त्रोटक स्वरुपात आहेत. ह्यापेक्षा कितीतरी फायदे नामस्मरणाने होतात. तुम्ही जेव्हा स्वत: नामस्मरणाला सुरुवात कराल, तेव्हा तुमच्या लक्षात येईल. नामस्मरण करत असताना बऱ्याच वेळा कानांमध्ये ध्वनी ऐकु येतो. याला अनाहत ध्वनी म्हणतात. अनाहत म्हणजे कोणत्याही घर्षणाशिवाय तयार होणारा ध्वनी! ध्वनी हे दोन वस्तुंच्या घर्षणाने तयार होतो, त्याला आहत ध्वनी म्हणतात. अनाहत ध्वनी हा दैवी ध्वनी आहे. मला सुरुवातीला जेव्हा हा ध्वनी ऐकु आला, तेव्हा मी पुर्ण अनभिज्ञ असल्यामुळे कानांमध्ये काही problem आलाय का, असेच मला वाटले. तसंही बालपणापासुन कानांची क्षमता कमजोर असल्यामुळे तसे वाटणे साहजिकच होते. नंतर दुसऱ्या, तिसऱ्या वेळी लक्षपुर्वक ऐकले असता लक्षात आले, हा जप आहे ! खरं तर हा दैवी संकेतच होता, पण माझ्यासारख्या मुर्ख बाईला हे लगेच कुठे लक्षात येणार ! आपल्या शरीरात हृदयाचा ध्वनी हा अनाहत ध्वनी असतो.

अजुन एक अनुभव, जो मी वर लिहिला आहे. नामस्मरणाला सुरुवात करुन फार दिवस झाले नव्हते. जप करायचा कंटाळाच येत होते. आपण करतोय ते बरोबर की चुक, हे ही कळत नव्हते. एकदा अशीच सकाळी ११-११:३० च्या दरम्यान हॉलमध्ये खिडकीजवळ बसले होते. जवळच एका ताटलीत पक्ष्यांना ज्वारीचे दाणे टाकले होते. २/३ कबुतरे बिनधास्त दाणे टिपत होती. एक चिमणी आली आणि अगदी माझ्या जवळ दाणे टिपायला लागली. दुसरीही चिमणी आली आणि ती ही दाणे टिपु लागली. मला आश्चर्यच वाटले. घाबरत कश्या नाहीत ह्या ? हा नामस्मरणाचा effect तर नसेल ? मी हळुच उठले आणि किचनमधुन ओंजळीत ज्वारी भरुन आणली. त्या चिमण्यांसमोर ओंजळ धरली. काय



आश्चर्य, एक चिमणी चक्क माझ्या ओंजळीतच चढली आणि दाणे टिपु लागली. Amazing! भलताच चमत्कार होता हा ! काही वेळाने माझ्या ओंजळीतले दाणे कबुतरांनी बघितले आणि ती ही जवळ येऊ लागली. मला bird pneumonia, flue वगैरे काय-काय आठवायला लागले आणि मग मात्र मी हे पक्षी प्रेम आवरते घेतले. नामस्मरणाच्या ह्या चमत्काराने मी खुपच भारावुन गेले. आपण योग्य दिशेने चाललोय, ह्याची खात्री पटली. उद्या मी कुंडली कशी शुद्ध होते, त्याचे संगतवार तपशील देणार आहे. तत्पुर्वी नामस्मरण म्हणजे काय, असा एक प्रश्न एकाने विचारला आहे.

नामस्मरण म्हणजे देवाचे सतत, अखंड नाव घेत रहाणे. ही व्याख्या सांगितल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. हो, नाहीतर सगळं रामायण सांगुन झाल्यावर सीता रामाची कोण ? असा प्रश्न नको पडायला !

**- वैद्य वर्षा लाड**

३
सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. १३ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# आमदार रणधीर सावरकर यांची मेडिकल कॉलेजला अचानक भेट

## 3 तास पाहणी, रुग्णांशी संवाद, स्वच्छता आणि सुविधांबाबत निर्देश

प्रतिनिधी १३ जुलै

**अकोला :** अकोला मेडिकल कॉलेज व जिल्हा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी अकोला मेडिकल कॉलेज अभ्यासगत समितीचे अध्यक्ष आमदार रणधीर सावरकर यांनी आज अचानक भेट देऊन संपूर्ण परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी चांगले काम करणाऱ्या वैद्यकिय सेवेतील प्रत्येकाचे कौतुक केले त्याच बरोबर जिथे प्रशासनाचे चुकत आहे त्या चुका अधोरेखित केल्या.



आमदार सावरकर यांनी तब्बल ३ तास रुग्णालय परिसर पिंजून काढला. प्रत्येक वार्डमध्ये जाऊन रुग्णांची विचारपूस केली. रुग्णांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. स्वच्छता, औषधे, उपचार आणि इतर सुविधांबाबत माहिती घेतली. यावेळी त्यांनी डॉक्टरांशी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजाचा आढावा घेतला. रुग्णांना कोणतीही अडचण येऊ नये आणि सर्वांना तातडीने चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. राज्य शासनाकडे प्रलंबित असले प्रश्न त्वरित सोडवण्याचे अभिवचनही त्यांनी दिले. विशेष म्हणजे आ. सावरकर यांनी जात, पात, धर्म बाजूला ठेवून समाज, जाती व वेगवेगळ्या जिल्ह्यांतून आलेल्या नागरिकांशी आस्थेने संवाद साधला. समिती सदस्य जयंत मसने, ॲड. देवाशिष काकड, डॉ. किशोर मालोकार, डॉ. शंकरराव वाकोडे, धनंजय धबाले, वसंत बाछुका, मोहन पारधी, विवेक भरणे, पवन महल्ले आदी उपस्थित होते. आ. सावरकर म्हणाले, 'रुग्णसेवा हीच खरी सेवा आहे. मेडिकल कॉलेजमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला सन्मानाने उपचार मिळाले पाहिजेत.'

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजना

## व्यापक शेतकरीहित साधणारी योजना

**अकोला :** राज्य शासनाने सुरू केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना व्यापक शेतकरीहित साधणारी योजना आहे.

कर्जमाफी, एकवेळ समझोता, प्रोत्साहनपर लाभ हे या योजनेचे तीन घटक आहेत. ज्यांनी १-४-२०१९ ते ३१-३-२०५ या काळात एक किंवा अधिक अल्पमुदती पीक कर्जे घेतली किंवा ज्यांच्या या कालावधीतील पीक कर्जाचे पुनर्गठन- फेरपुनर्गठन झाले असे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. परंतु कर्ज हप्ते ३०-९-२०२५ रोजी थकित असणे व ३१-३-२०२६ पर्यंत परतफेड न झालेली बाकी २ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अशा शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल.ज्या शेतकऱ्यांना महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभ मिळाला, अशा शेतकऱ्यांकडील अखेरची थकबाकी ५०,००० किंवा कमी असल्यास त्यांना ५०,००० रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी १-४-२०१९ ते ३१-३-२०५ या काळात एक किंवा अधिक अल्पमुदती पीक कर्जे घेतली किंवा ज्यांच्या या कालावधीतील कर्जाचे पुनर्गठन- फेरपुनर्गठन झाले असे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. परंतु कर्ज हप्ते थकबाकी ३०-९-२०२५ रोजी २ लाख रुपयापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. ही थकबाकी ३१-३-२०२६ पर्यंत परतफेड झालेली नसावी. अशा शेतकऱ्यांना प्रथम २ लाखावरील रक्कम बँकेत भरणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांना २ लाख रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळेल. ज्या शेतकऱ्यांना महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभ मिळाला आहे अशा शेतकऱ्यांकडील ५०,००० रुपयांवरील रक्कम बँकेत भरल्यास ५०,००० रुपये कर्जमाफी मिळेल.

२०२२-२३, २०२३- २४, २०२४-२५ या आर्थिक वर्षात पीककर्ज घेऊन त्याची किमान दोन वर्षे परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५०,००० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळेल. मात्र त्यासाठी २०२५-२६ व २०२६- २७ मधील पीककर्जाची मुदतीपूर्वी परकतफेड करणे आवश्यक आहे.

# उपचाराच्या नावाखाली विवाहितेवर अत्याचार

## अत्याचार करणाऱ्या मौलानाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १३ जुलै

**पातूर :** शहरात उपचाराच्या नावाखाली एका २९ वर्षीय विवाहित महिलेवर अत्याचार केल्याची आणि त्यानंतर तिला व तिच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पातूर पोलिसांनी एका मौलानाविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

प्राप्त माहितीनुसार अकोला येथील रहिवासी असलेल्या २९ वर्षीय विवाहित महिलेच्या तक्रारीवरून मुजीब मौलाना रा. मरहबा कॉलनी, मच्छी मार्केट, पातूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, पीडितेच्या मुलीला रात्री झोपेत वारंवार बडबडण्याची समस्या होती. नातेवाईकांच्या सल्ल्यावरून ती आपल्या मुलीला उपचारासाठी आरोपीकडे घेऊन गेली होती. आरोप आहे की, त्याच वेळी आरोपीने पीडितेलाही उपचाराची गरज असल्याचे सांगून तिचा विश्वास संपादन केला आणि उपचाराच्या बहाण्याने तिच्यासोबत अश्लील चाळे केले. आरोपीवर विश्वास असल्यामुळे आणि उपचार सुरू असल्यामुळे पीडितेने सुरुवातीला याबद्दल कोणालाही काही सांगितले नाही. याचाच फायदा घेऊन आरोपीने तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

महिला अधिक आरोप करताना म्हणाली की, या घटनेनंतरही आरोपी तिच्या घरी पोहोचला आणि तिला आपल्यासोबत चालण्यासाठी दबाव आणू लागला. जेव्हा तिने याला विरोध केला, तेव्हा आरोपीने पीडितेला आणि तिच्या कुटुंबाला गंभीर परिणाम भोगण्याची व जीवे मारण्याची धमकी दिली. याच धमक्यांमुळे पोलिसांत तक्रार दाखल करण्यास उशीर झाला. पीडितेने सर्वप्रथम बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र, हे घटनास्थळ पातूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने हा गुन्हा पातूर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला.

# पावसाच्या विश्रांतीने शेतकरी चिंतित

**अकोला :** गेल्या आठवड्यात जिल्ह्यात रिमझिम पावसामुळे शेतकरी आनंदात दिसत होते. वातावरण छान निर्माण झाले होते. मात्र या आवड्यात पावसाने विश्रांती घेतली असून, 13 जुलैपर्यंत दमदार पावसाचा कोणताही इशारा प्रादेशिक हवामान विभागाने दिलेला नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली आहे. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पिकांच्या उगवणीसह वाढीवर परिणाम द्रोण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पिकांना पाणी आवश्यक आहे. कारण सध्या पुन्हा तापू लागल्यामुळे पिके कोमेजू लागली आहे. पिकांना सध्या पावसाची नितांत आवश्यकता आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्यामुळे पिकांना पाण्याची गरज आहे. एक दोन दिवसात पाउ्स झाला तर पिके तग धरू शाकतात.

# बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई व शेतकऱ्यांना न्याय मिळावा

## मो. जावेद जकारिया यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेल

प्रतिनिधी १३ जुलै



**अकोला :** राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटक सचिव मो. जावेद जकारिया यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून अकोला जिल्ह्यातील बोगस व निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे झालेल्या मोठ्या आर्थिक नुकसानीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध केवळ गुन्हे दाखल करून थांबणे पुरेसे नसून संबंधित कंपन्या व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत व योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी.

मो. जावेद जकारिया यांनी मुख्यमंत्र्यांकडे बोगस बियाणे उत्पादक कंपन्यांचे परवाने रद्द करणे, दोषींना तात्काळ अटक करणे, राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविणे आणि भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीस आळा घालण्यासाठी कठोर यंत्रणा उभारण्याची मागणी केली आहे.

शेतकरी हा राज्याचा कणा असून त्याची फसवणूक करणाऱ्यांवर सरकारने कठोर व उदाहरणात्मक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# जिल्ह्यात मतदार सूची विशेष गहन पुनरीक्षण कार्यक्रम सुरु

- बीएलओ घरोघरी जाऊन करत आहेत फॉर्मचे वाटप
- सर्व मतदारांनी फॉर्म भरून द्यावेत, जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी १३ जुलै

**अकोला :** मतदाता सूची विशेष पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, सर्व मतदारांनी घरी येणाऱ्या बीएलओ यांना सहकार्य करत आपले फॉर्म भरून द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

सध्या जिल्ह्यात मतदार सूची विशेष गहन पुनरीक्षण म्हणजेच 'एसआयआर' चे काम सुरू आहे. यामध्ये मतदारांची नोंदणी करणे, नावातील चुका दुरुस्त करणे, नवीन मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे आणि लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग आवश्यक आहे. या कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ ३० जूनपासून घरोघरी जात आहेत.

आतापर्यंत शहरात ८०टक्के फॉर्मचे वाटप पूर्ण झाले आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी आपले फॉर्म योग्य पद्धतीने भरून आपल्या बीएलओकडे जमा करावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# शिवसेना (शिंदे गट) तर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



प्रतिनिधी १३ जुलै

**पातूर :** शिक्षणाला प्रोत्साहन देत समाजाप्रती असलेली बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने शिवसेना (शिंदे गट)च्या वतीने पातूर येथील नगर परिषद शाळा क्रमांक १ मध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणाऱ्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिवसेना (शिंदे गट)चे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी पालकमंत्री बच्चू कडू तसेच अकोला जिल्हा प्रभारी आमदार डॉ. राजेंद्र साळवी यांच्या प्रेरणेने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. अकोला जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर श्रीरंग दादा पिंजरकर यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. पातूर पंचायत समितीचे माजी सभापती अनंत उर्फ बालू बगाडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या उपक्रमात वाढदिवसावरील अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर जीवनात मोठे यश मिळविण्याचे मार्गदर्शनही करण्यात आले. या प्रसंगी किरणकुमार निमकंडे, पुरुषोत्तम भगत, संदीप उमाळे, निलेश बगळेकर, विलास धोंगडे, शाम गाडगे, विलास देवकर, राहुल भगत, डॉ. मंगेश चव्हाण, अजय राहुळकर, वासुदेव गवळी, दिनेश बोचरे, दशरथ राऊत शेगोकार यांच्यासह नगर परिषद शाळा क्र. १ च्या मुख्याध्यापिका सौ. जोशी मॅडम, झाडोकार सर तसेच शिवसेना (शिंदे गट)चे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या शिवसेना (शिंदे गट)च्या या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे शिक्षक, पालक आणि नागरिकांकडून स्वागत व कौतुक करण्यात आले.

# तहसील कार्यालयात स्टॅम्प विक्रेते व दस्तलेखकांचा मनमानी कारभार?

प्रतिनिधी १३ जुलै

**पातूर :** पातूर तहसील कार्यालय परिसरात काही स्टॅम्प विक्रेते आणि दस्तलेखक अक्षरशः मनमानीचा बाजार मांडत असून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरले जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे. शासनाकडून स्टॅम्प विक्रीचा अधिकृत परवाना मिळालेला असतानाही काही दस्तलेखक प्रत्यक्ष स्टॅम्प विक्री न करता केवळ दस्त नोंदणी, खरेदी-विक्रीची कामे आणि स्वतःच्या सोयीचीच कामे करण्यावर भर देत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, काही स्टॅम्प पेपर विक्रेत्यांकडे कोर्ट फी तिकीट विक्रीचा अधिकृत परवाना असूनही ते मुद्दाम कोर्ट फी तिकीट विक्री टाळत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

त्यामुळे न्यायालयीन व महसुली कामांसाठी आलेल्या नागरिकांना तिकीट मिळविण्यासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत असून त्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास प्रचंड वाढला आहे.

परवाना घेऊनही स्टॅम्प व कोर्ट फी तिकीट विक्री न करणे हे केवळ शासनाच्या नियमांचे उल्लंघन नाही, तर नागरिकांची उघड उघड फसवणूक आणि प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार असल्याची तीव्र चर्चा तहसील परिसरात सुरू आहे. संबंधित परवानाधारकांची तातडीने तपासणी करून त्यांच्या परवान्याच्या अटींचे पालन होत आहे की नाही, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची दुय्यम निबंधक श्री. राठोड यांनी तातडीने आणि कठोरपणे दखल घेऊन संबंधित स्टॅम्प विक्रेते व दस्तलेखकांची चौकशी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक व कठोर कारवाई करून नागरिकांना कोर्ट फी तिकीट व स्टॅम्प पेपर सहज उपलब्ध करून द्यावेत, अशी ठाम मागणी नागरिकांनी केली आहे.

# सेवानिवृत्त आणि ज्येष्ठांनी आनंदी जीवनासाठी सकारात्मक सेवा कार्यात सहभाग घ्यावा : चंद्रशेखर पंडित

प्रतिनिधी १३ जुलै



**अकोला :** शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या पेन्शनर्स आणि जेष्ठ नागरिकांनी समाजसेवेत सकारात्मक सेवा कार्यात सहभाग घ्यावा निसर्गाच्या नियमाप्रमाणे शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम प्राणायाम आणि आहार घ्यावे नकारात्मक बाबी टाळाव्यात समाज हितासाठी आणि परिवारासाठी आपला वेळ द्यावा असे आवाहन सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता आणि सुप्रसिद्ध साहित्यिक चंद्रशेखर पंडित यांनी केले. अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनच्या मासिक सभेत साठावे वरीस धोक्याचे या विषयावर बोलताना केले. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अध्यक्ष प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मागील महिन्यात दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर निवृत्तीवेतन धारकांच्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड, सचिव एकनाथराव उके, पोस्टल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तुळशीराम बोबडे, पसायदानामृत मासिकाचे संपादक सुरेशराव कुलकर्णी, सहसचिव किशोर बुटोले, सौ. ललिता पंडित उपस्थित होत्या. प्रमुख अतिथींचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चंद्रशेखर पंडित यांनी एकाच वर्षात लिहिलेल्या देव जसा आहे तसा का आहे भाग एक भाग दोन आणि भाग 3 तसेच हनुमंत जसे आहेत तसे का आहेत या चार पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, सुरेशराव कुलकर्णी संपादित केलेल्या पसायदानामृत मासिकाच्या जुलै अंकाचे विमोचन ही करण्यात आले.

याप्रसंगी तुळशीराम बोबडे, सुरेशराव कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. सत्यनारायण बाहेती यांनी अध्यक्षीय मनोगतात संघटनेच्या कार्यात सर्व सभासदांनी जास्तीत जास्त तन-मन-धनाने सहकार्य करावे असे आवाहन केले.

# प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठानच्या आंदोलनाला यश

प्रतिनिधी १३ जुलै

**बाळापूर :** राज्यातील विविध प्रकारच्या लोककलावंतांच्या समस्या संदर्भात गेले कित्येक वर्षापासून प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठान राज्यव्यापी संघटना शासनाकडे वेळोवेळी तसेच प्रत्येक अधिवेशनावर धरणे मोर्चे आंदोलने करून निवेदने देत आहे व त्या निवेदनांचा पाठपुरावा सुद्धा करणे सुरू आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनावर कलावंतांच्या मागण्यांची निवेदन संस्थापक अध्यक्ष प्रकाश अवचार यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यामधून प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशासनाच्या मार्फत हे निवेदन शासनापर्यंत पोहोचविले या निवेदनाचा परिणाम झाला शासनाने अधिवेशनामध्ये कलावंतांच्या मागण्या मान्य करून मानधनात वाढ सुद्धा करण्याचे आवाहन केले आहे राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सन्माननीय आशिष शेलार साहेब यांनी कलावंताकडे खरोखरच आपुलकीने लक्ष दिले आणि कलावंतांची हाक त्यांनी ऐकून कलावंतांना थोडासा आधार दिला यामध्ये कलावंतांचे दोन कोटी 22 लाख असलेले अनुदान हे चार कोटी चाळीस लाख केले त्याचप्रमाणे दशावतार कलावंतांच्या संदर्भात लक्ष घालून त्यांना एक आधार दिला त्याचप्रमाणे प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने सुरू असलेल्या मागण्या पैकी मुख्य मागणी त्यांनी मान्य केली ती म्हणजे कलावंतांना शासनाचे अधिकृत ओळखपत्र हे कलावंतांना सुद्धा आता मिळणार आहेत जिल्हास्तरावर प्रत्यक्ष संबंधित अधिकारी पंचायत समिती अधिकारी यांच्या हस्ते कलावंतांची पडताळणी करून त्यांना अधिकृत ओळखपत्र देण्याचे आवाहन सुद्धा केले आहे व राज्यात चार प्रकारच्या नवीन कलावंतांना सुद्धा अनुदान योजनेमध्ये सहभागी करून घेतले आहे यामध्ये नमन खेडे जाकडी वही गायन आणि झाडीपट्टी या चार प्रकारच्या कलावंतांना सुद्धा यापुढे अनुदानाचा लाभ मिळणार आहे त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत प्रत्येक लोक कला पथकातील 20 कलपतकांना प्रत्येकी 50 हजार रुपये याप्रमाणे दहा लाख एवढे अनुदान देण्यात येणार आहे कलावंतांच्या संदर्भात राज्यातील काही आमदारांनी लक्षवेधीमध्ये कलावंतांचे प्रश्न मांडले यामध्ये निलेश राणे भास्कर जाधव सुनील प्रभू यांचाही समावेश आहे.

# डॅडी देशमुख यांचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी- प्राचार्य डॉ.अंबादास कुलट

## स्व. डॅडी देशमुख स्मृतिप्रित्यर्थ `रंग भरो चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १३ जुलै

**अकोला :** अकोला नगरीचे माजी नगराध्यक्ष,प्राचार्य स्व. डॅडी देशमुख यांनी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य बालकुमार,युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन श्री.शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी केले.

स्व.डॅडी देशमुख यांच्या२१ व्या पुण्यतिथी निमित्त ललित कला अकॅडमी व बाबुजी देशमुख वाचनालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. शिवाजी महाविद्यालय परिसरात आयोजित `रंग भरो चित्रकला स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार, ललित कला अकॅडमीचे अध्यक्ष प्रा.सुरेश राऊत,उद्योजक प्रशांत देशमुख, बाबूजी देशमुख वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्रा यांची विचार पिठावर प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. डॅडी देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्व. डॅडी देशमुख यांचे विचार, कार्य समाजात पोहोचावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन महादेवराव भुईभार यांनी केले. स्व. डॅडी देशमुख हे समाजप्रबोधक होते. त्यांनी आयुष्यभर वाचन संस्कृती, ललित कला आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला असे भावोद्गार प्रा.सुरेश राऊत यांनी काढले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन बबनराव कानकिरड यांनी केले. जुने शहरातील विद्यार्थ्यांसाठी श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा येथे मुख्याध्यापक मनोज देशमुख, तायडे सर ,पंकज देशमुख व बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय परीक्षा केंद्रावर प्राचार्य गजानन बोबडे यांच्या संयोजनात हजारो शालेय विद्यार्थ्यांनी रंग भरो स्पर्धेत भाग घेतला. ललित कला अकॅडमीच्या राजश्री देशमुख यांच्यासह शहरातील मान्यवरांनी भेट देवुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रख्यात चित्रकार सतीश पिंपळे,मधुकर मानकर,नागपूरे ,प्रदीपसिह चंदेल व प्रमोद गिते यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. श्री.शिवाजी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.शुभम राठोड,सहा. अधिकारी प्रा.पवनकुमार गिरी,प्रा. मयुरी गुलदे यांच्या मार्गदर्शनात रासेयो विद्यार्थ्यांनी व बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव निमित्त बैठक

**हिवरखेड :** येथील मातंग समाज सभागृहात मातंग समाजाची महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली, या बैठकीमध्ये

येणाऱ्या १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साजरी करण्याबाबत उत्सव समिती गठित करण्यात आली. या बैठकीला उपस्थित समाजातील मधुकर वानखडे , शिवा धूरदेव ,उमेश धूरदेव ,दीपक धूरदेव, यांच्यासह हनुमान जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपद विकास धूरदेव उपाध्यक्ष अभिषेक धूरदेव सचिव गोलू धूरदेव कोषाध्यक्ष अनुराग धूरदेव तसेच प्रसिद्धी प्रमुख अनुप धूरदेव यांची एक

## निधन वार्ता

### पुरूषोत्तम श्रावगी



**अकोला :** येथील समाजसेवक आणि श्रावगी टॉवरचे संचालक पुरूषोत्तम महादेवजी श्रावगी यांचे १२ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

### देवीदास राहाटे



**अडगाव बु. :** शिवाजी नगरचे प्रतिष्ठित नागरिक देविदास राहाटे यांचे १२ जुलैला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी व आप्त परिवार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १३ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## पावसाळी साहित्याने बाजारपेठ सजल्या; पण ग्राहकच नाही

प्रतिनिधी १३ जुलै

**यवतमाळ** : यावर्षी एल निनोचा प्रभाव जिल्ह्यात जाणवत आहे. जिल्ह्यातील काही भागात जोरदार पाऊस झाला. तर काही भागात पावसाची नुसती हजेरी राहिली. यामुळे पावसापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांकडून होणारी पावसाळी साहित्याची खरेदीच प्रभावित झाली आहे. जिल्ह्यात या वस्तूची विक्री करणाऱ्या दुकानाची संख्या मोठी आहे. मात्र तूर्त ग्राहक नसल्याने विक्रेते पावसाच्या प्रतीक्षेत खोळंबले आहेत. दरवर्षी पावसाला सुरुवात होताच पावसापासून संरक्षण करणाऱ्या रेनकोट, छत्री, प्लास्टिक कोटेड साहित्य, गाडी गव्हर आणि मेनकापड विक्री मोठ्या प्रमाणात होते. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या या ठिकाणी अशा वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण लाखांच्या घरात आहे. प्रत्यक्षात हा बाजार जुलै महिन्यात थंड पडला आहे. यातून विक्रेते चिंतेत आहेत. शहरासह ग्रामीण भागातही बाजारपेठा पावसाळी साहित्यांनी सजल्या आहेत. यासोबत कवलारू घरे आणि दुकानाच्या संरक्षणासाठी विक्री होणाऱ्या प्लास्टिक ताडपत्र्या विक्रीचे प्रमाण अधिक आहे. मात्र इतर साहित्य विक्रीचे प्रमाण घटले आहे.

# जि.प. कर्मचारी पतसंस्थेचा 6.70 कोटींचा निव्वळ नफा; गृहकर्जाचा व्याजदर 9 टक्क्यांवर

### सभासदांसाठी ५० लाखांपर्यंत कर्ज, डिजिटल सेवांचा विस्तार

प्रतिनिधी १३ जुलै




**यवतमाळ** : आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांच्या विश्वासाच्या बळावर यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ६ कोटी ७० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. या पार्श्वभूमीवर सभासदांना दिलासा देत गृहकर्जाच्या व्याजदरात कपात करून तो केवळ ९ टक्क्यांवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. ही माहिती संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

६१ वर्षांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या या पतसंस्थेचे १० हजार ७२५ सभासद असून, संस्थेला सातत्याने 'अ' दर्जाचे लेखापरीक्षण प्राप्त होत आहे. नव्या निर्णयानुसार सभासदांना स्वतःचे घर उभारण्यासाठी ५० लाख रुपयांपर्यंत गृहकर्ज केवळ ९ टक्के वार्षिक व्याजदराने उपलब्ध होणार असून, कर्ज मंजूर झाल्यानंतर रक्कम थेट बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

संस्थेने आतापर्यंत २३७ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे. भागभांडवल ३३ कोटी ९६ लाख रुपये, राखीव निधी ४९ कोटी रुपये, तर ठेवी ३४० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्या आहेत. याशिवाय, विविध नामांकित बँकांमध्ये १८० कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक करण्यात आली असून संस्था पूर्णपणे स्वबळावर कार्यरत असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत संस्थेकडून दरवर्षी दहावी-बारावी तसेच जेईई, नीट, एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. दुर्धर आजारांनी ग्रस्त सभासदांनाही आर्थिक मदत दिली जाते. मागील वर्षात २६ गरजू सभासदांना ३ लाख ६० हजार रुपयांचा मदतनिधी वितरित करण्यात आला.

'सभासद कुटुंब आधार योजने'अंतर्गत १८ मृत सभासदांच्या वारसांना प्रत्येकी ६ लाख रुपये, तर डीसीपीएसधारक १० मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १२ लाख रुपये देण्यात आले. या योजनांमधून एकूण २ कोटी २८ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले. तसेच सभासदांसाठी ३० लाख रुपयांच्या अपघाती विमा योजनेअंतर्गत एका सभासदाच्या वारसाला विम्याची रक्कमही अदा करण्यात आली.

डिजिटल बँकिंगला चालना देण्यासाठी संस्थेने आरटीजीएस, एनईएफटी, नेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंग सुविधा सुरू केल्या असून, आगामी काळात सभासदाभिमुख सेवा आणि डिजिटल सुविधांचा आणखी विस्तार करण्यात येणार असल्याचे महेश सोनेकर यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष संजय गावंडे, सचिव संजय विहाडे, संचालक मंडळातील सदस्य तसेच सरव्यवस्थापक मारोती राजगडकर उपस्थित होते.

## महामार्गासाठी वृक्षतोड; वृक्षलागवडीकडे दुर्लक्ष

प्रतिनिधी १३ जुलै



**उमरखेड** : नागपूर–बोरी–तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ च्या रुंदीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली. अनेक वर्षे परिसराला सावली देणारे, पर्यावरणाचा समतोल राखणारे आणि पक्षी-प्राण्यांचे आश्रयस्थान ठरलेले हजारो वृक्ष विकासकामासाठी हटविण्यात आले. मात्र, त्या बदल्यात नियमानुसार करावयाची भरपाईची वृक्षलागवड अद्यापही झालेली नसल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी केला आहे.

राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे परिसरातील हरित पट्टा कमी झाला असून उन्हाळ्यात तापमानात वाढ, सावलीचा अभाव आणि प्रदूषणाचे प्रमाण वाढल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. पर्यावरण संरक्षणाच्या नियमांनुसार तोडलेल्या प्रत्येक वृक्षाच्या बदल्यात नवीन वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करणे संबंधित यंत्रणांवर बंधनकारक असते. मात्र, महामार्गालगत अशा वृक्षलागवडीची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नसल्याचा दावा करण्यात येत आहे.

राज्य शासन एकीकडे 'हरित महाराष्ट्र' आणि 'एक वृक्ष आईच्या नावाने' यांसारख्या मोहिमांद्वारे वृक्षलागवडीचा संदेश देत असताना, दुसरीकडे महामार्ग प्रकल्पांमध्ये भरपाईची वृक्षलागवड होत नसल्यास त्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार असल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

तोडण्यात आलेल्या वृक्षांची अधिकृत संख्या, त्याबदल्यात किती वृक्ष लावण्याचे नियोजन आहे आणि त्याचे संगोपन कोणत्या यंत्रणेमार्फत केले जाणार, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच महामार्गालगत तातडीने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून तिचे नियमित संवर्धन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

विकासकामे आवश्यक असली तरी पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही तितक्याच प्राधान्याने पार पाडली गेली पाहिजे. अन्यथा वाढते तापमान, पाण्याची टंचाई आणि प्रदूषणाचे दुष्परिणाम भविष्यात अधिक तीव्र होतील, असा इशारा पर्यावरण अभ्यासकांनी दिला आहे.

## श्री तुळजाभवानी मातेस २७ तोळ्यांचा सुवर्ण अलंकार अर्पण

### चिन्मय मूर्ती संस्थानचे मठाधिपती माधवानंद महाराज यांचा सत्कार

प्रतिनिधी १३ जुलै





**उमरखेड** : उमरखेड येथील चिन्मय मूर्ती संस्थानचे मठाधिपती परमपूज्य माधवानंद महाराज यांनी रविवारी (दि. १२) येथे दर्शन घेत देवीच्या चरणी २७ तोळ्यांचा सुवर्ण पेशवाई अलंकार अर्पण केला.

यावेळी वैदिक मंत्रोच्चारात विधिवत पूजाअर्चा करून सुवर्ण अलंकार समर्पित करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यास चिन्मय मूर्ती संस्थानचे कुलमुखत्यार ॲड. महेश कनकदंडे उपस्थित होते.

या भक्तिमय उपक्रमाची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान समितीच्या वतीने परमपूज्य माधवानंद महाराज तसेच ॲड. महेश कनकदंडे यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांनी देवीच्या चरणी राज्यात सुख, समृद्धी, शांतता आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. धार्मिक श्रद्धा, सेवा आणि समर्पणाचा हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

## जीवन प्राधिकरणाच्या निष्काळजीपणा; सिंचन नगरातील नागरिक रस्त्यावर उतरणार

### वारंवार गळती, रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य

प्रतिनिधी १३ जुलै



**यवतमाळ** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कथित हलगर्जीपणामुळे यवतमाळ शहरातील सिंचन नगर भाग क्रमांक १ मधील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वारंवार फुटणाऱ्या पाणीपुरवठा जलवाहिनीमुळे रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, वाहतुकीसह नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकदा तक्रारी करूनही केवळ तात्पुरती दुरुस्ती केली जात असल्याने रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जलवाहिनी फुटल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहते. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी खोल खड्डे निर्माण झाले आहेत. शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दुचाकीस्वारांना या मार्गावरून ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपघाताची भीतीही कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. पावसाचे पाणी आणि जलवाहिनीतील गळतीमुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून, पायी चालणेही कठीण झाले आहे. अनेक नागरिक घसरून जखमी झाल्याच्या घटनाही घडत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

जलवाहिनीच्या गळतीमुळे दूषित पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळण्याची शक्यता निर्माण झाली असून, जलजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. साचलेल्या पाण्यात जनावरेही पडत असल्याने परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून ही समस्या कायम असतानाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली नाही, असा आरोप रहिवाशांनी केला. दूरध्वनी व लेखी तक्रारी करूनही कर्मचाऱ्यांकडून केवळ तात्पुरती दुरुस्ती होत असल्याने काही दिवसांत पुन्हा जलवाहिनी फुटत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत असून, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

सिंचन नगर भाग क्रमांक १ मधील नागरिकांनी जलवाहिनीची कायमस्वरूपी दुरुस्ती, रस्त्याची पुनर्बांधणी, दूषित पाणीपुरवठा रोखण्यासाठी तातडीची उपाययोजना आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मागण्यांकडे त्वरित लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील, असा इशारा नागरिकांनी दिला.

## सेवाभावी कार्यातून समाजपरिवर्तनाची ताकद रोटरीमध्ये यवतमाळ येथे रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा

प्रतिनिधी १३ जुलै




**यवतमाळ** : रोटरी क्लब ही जगभर कार्यरत असलेली अत्यंत विश्वासार्ह, सेवाभावी आणि मानवतावादी संस्था आहे. 'सेवेपेक्षा श्रेष्ठ काहीही नाही' हा विचार घेऊन रोटरीने समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविला आहे. समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे सामर्थ्य रोटरीमध्ये आहे, असे प्रतिपादन रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी 2028-29 तथा इन्स्टॉलिंग ऑफिसर निलेश परतानी यांनी केले. यवतमाळ येथील हॉटेल जसराज सभागृहात रोटरी क्लबच्या २०२६-२७ च्या पदग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून वरीष्ठ वकील राजेश साबळे, असिस्टंट गव्हर्नर मनोज मोहता, सौ प्रिती गवरशेट्टीवार, सौ अपर्णा हर्षे यांची उपस्थिती होती.

निलेश परतानी पुढे म्हणाले की, रोटरीच्या माध्यमातून प्रत्येकाला निःस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य करण्याची संधी मिळते. समाजहितासाठी केलेली मदत हेच खरे पुण्य असून, प्रत्येकाने रोटरीच्या सेवाभावी उपक्रमांना सहकार्य करून समाजकार्यात आपले योगदान द्यावे. नवनिर्वाचित अध्यक्ष अँड डॉ प्रवीण अशोकराव हर्षे व त्यांच्या कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली क्लबची सेवाभावी वाटचाल अधिक व्यापक आणि गतिमान होईल. समाजसेवेची ही परंपरा अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने पुढे यावे, असेही ते म्हणाले. मावळते अध्यक्ष डॉ आशिष गवरशेटीवार यांनी आपल्या कार्यकाळातील विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व पर्यावरणविषयक उपक्रमांचा आढावा घेत सदस्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नूतन अध्यक्ष म्हणून अँड प्रवीण अशोकराव हर्षे, सेक्रेटरी प्रशासनान म्हणून लक्ष्मीकांत लोळगे, डॉ आनंद भंडारी प्रकल्प सचिव तर खजिनदार म्हणून विपुल खिवसरा यांनी आपल्या संचालक मंडळासह डॉ मोहनसिंह शेर आणि तुषार पद्मवार यांचे कडून पदभार स्वीकारला. प्रमुख अतिथी अँड राजेश साबळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी अँड राजेश साबळे यांना रोटरी क्लबचे मानद सदस्य पद प्रदान करण्यात आले. यवतमाळ नगर परिषद च्या अध्यक्षा प्रियदर्शनी ताई उइके यांना ही रोटरी क्लब ऑफ यवतमाळ चे सदस्य पद स्विकारले. मावळते अध्यक्ष डॉ आशिष गवारशेट्टीवार यांनी वर्षभरातील कार्याचा आढावा मांडला.

नूतन अध्यक्ष अँड डॉ प्रवीण अशोकराव हर्षे यांनी वर्षभरात दर्जेदार सामाजिक उपक्रम राबवून रोटरीचे नाव अधिक उंचावण्याची ग्वाही दिली. रोटरीच्या प्रत्येक सदस्याला सोबत घेऊन अधिकाधिक लोकाभिमुख व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यास प्राधान्य देणार आहे. आरोग्य, शिक्षण,पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण, युवक विकास आणि गरजूंसाठी विविध सेवा प्रकल्प प्रभावीपणे राबवून रोटरीचे कार्य कोनाकोपऱ्यात पोहोचविण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. सौ. मनीषा ढोने यांनी विठ्ठल गीत, ज्ञाप्ति हर्षे हिने गणेश नृत्य सादर केले, मधुरा हर्षे हिने सरस्वती वंदना आणि सौ राजश्री धर्माधिकारी यांनी रोटरी प्रार्थनेचे गायन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद जैन व खुशबू भंडारी यांनी केले. सचिव प्रशासन लक्ष्मीकांत लोळगे यांनी आभार मानले. या सोहळ्याला सर्व रोटरी सदस्य अनेक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि गणमान्य व्यक्ति उपस्थित होते.

## जिजामाता कला महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्राम

प्रतिनिधी १३ जुलै




**दारव्हा** : जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये बी.ए. प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ८ ते ११ जुलैदरम्यान इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यादव सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे व्यवस्थापक अशोकभाऊ ठाकरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीचे प्राचार्य डॉ. दिलीप खुपसे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

मार्गदर्शन करताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, "शिक्षणाशिवाय व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे," असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. रूपाली कणसे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. रामधन हिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जयवंत जुकरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. पुरुषोत्तम बांडे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. राजेश गेडाम, नितेश कदम, सचिन माटोळे, सतीश सरतापे, विनोद कंठाळे, सोमराज लोहकरे आदींनी सहकार्य केले.

## वादळग्रस्त टाक कुटुंबाला 'माणुसकीची भिंत'चा आधार

### लोकसहभागातून घरबांधणीसाठी साहित्य सुपूर्द

प्रतिनिधी १३ जुलै



**पुसद** : पुसद येथील अनमोल नगर (कवडीपूर) परिसरातील प्रेम श्रीराम टाक यांचे घर २३ जून रोजी झालेल्या वादळात पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्यानंतर बेघर झालेल्या कुटुंबाला 'माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद'ने लोकसहभागातून मदतीचा हात दिला. सोशल मीडियाद्वारे केलेल्या आवाहनाला मिळालेल्या प्रतिसादातून ३१ हजार ४५५ रुपयांचा निधी जमा झाला.

या निधीतून लोखंडी टीन, अँगल, सिमेंट व अन्य आवश्यक साहित्य खरेदी करून रविवारी (१२ जुलै) श्रीरामपूर येथे टाक कुटुंबाला सुपूर्द करण्यात आले. मदतीचा स्वीकार करताना टाक कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. आतापर्यंत अन्य कोणतीही मदत मिळाली नसल्याचे त्यांनी सांगत सर्व दाते व संस्थेचे आभार मानले. परिसरातील नागरिकांनीही 'माणुसकीची भिंत'ने खऱ्या अर्थाने माणुसकी जपल्याची भावना व्यक्त केली.

या उपक्रमात मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था, रुग्णमित्र फाउंडेशन, गुरुदेव सेवा मंडळ यांच्यासह अनेक दानशूर नागरिकांनी आर्थिक व प्रत्यक्ष सहकार्य केले.

यावेळी सत्यपाल महाराज यांचे शिष्य पंकज पाल महाराज, गजानन अरगुलवार, निशांत देऊळकर, डॉ. अनुष्का तडकसे, प्रवीण गुंडेवार (मुंबई), स्वाती वाट (दळवी), प्रशांत नागरे, साहेबराव देवसरकर, पद्मभूषण राजगुरू , अनिल राठोड (पोहरादेवी), प्रशांत शिवणकर, मंथन कदम, रूपाली नरडे, जया राठोड, संदीप मानकर, विजय राठोड, साधना पौळ, अमित पातुरकर, गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश लामने, अंकित पटेल, प्रवीण चांडे, संगीता जाधव, अर्चना यादव, अमोल कांबळे, श्रीशा चव्हाण, सुशील जांबानी, दत्तराव पाईकराव, गौरव नाईक, मंजुषाताई डेकाटे, संतोष देशमुख, जयाजी तिजारे, अजय मानकर, अद्विक गिरगावकर, प्रवीण प्रकाश महाजन यांच्यासह अरुण कांबळे, राजेश्वर आडे, विष्णू गायकवाड, गजानन जाधव, अनंता चतुर, मंगेश भगत, पंजाब ढेकळे, संतोष गावंडे, रमेश डंबोळे, शांतीसागर इंगोले, नयन रामधनी, निखिल गादेवार, किरण किनाके, पवन बोजेवार, प्रमोद ठाकूर, धनंजय आघाम तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## पीकविमा भरपाईचा घोळ; मदतीअभावी शेतकरी संतप्त

प्रतिनिधी १३ जुलै



**महागाव** : सन २०२४-२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या महागाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना अद्यापही पीकविमा भरपाई मिळालेली नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर यंदाच्या २०२६ च्या खरीप हंगामात अनेक शेतकरी पीकविमा योजनेपासून दूर राहण्याच्या भूमिकेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

फुलसांवगी, राहूर, टेंभी, धनोडा, दहिसावळी, थार, कासारबेळ, हिवरा, खडका आदी गावांमधील हजारो हेक्टरवरील पिकांचे अतिवृष्टी व महापुरामुळे मोठे नुकसान झाले होते. संकटाच्या काळात पीकविमा योजनेतून आर्थिक दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. मात्र अनेक पात्र शेतकऱ्यांना अद्याप भरपाई न मिळाल्याने प्रशासनाविषयी असंतोष वाढला आहे.

या प्रश्नावर आमदार किसनराव वानखेडे यांनी विधानसभेत आवाज उठविल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला नसल्याची भावना व्यक्त होत आहे. वेळेत विमा भरपाई मिळाली असती, तर आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला असता, असे अनेक शेतकरी सांगतात.

महागाव-उमरखेड विधानसभा क्षेत्रातील पैनगंगा, लोअर पूस व शिप नद्यांच्या पुरामुळे विशेषतः धनोडा परिसरासह अनेक गावांतील शेतीचे मोठे नुकसान झाले होते. मात्र प्रशासकीय दिरंगाईमुळे आणि विमा प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक शेतकरी आजही भरपाईच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, शेतकरी पुत्र सचिन अमृतराव उबाळे यांनी, "महापुरामुळे मोठे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही. प्रशासकीय दिरंगाई आणि लोकप्रतिनिधींच्या अपुऱ्या पाठपुराव्यामुळे अनेक शेतकरी हक्काच्या मदतीपासून वंचित राहिले," असा आरोप केला. पीकविमा भरपाईचा प्रश्न तातडीने निकाली काढून पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम देण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# प्रत्यक्ष फिल्डवर उतरल्याशिवाय शहराची खरी अवस्था कळणार नाही!

## मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांचा स्पष्ट संदेश

प्रतिनिधी १३ जुलै




**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर स्थानिक माध्यमांशी प्रथमच दिलखुलास संवाद साधत शहराच्या विकासाबाबत आपली स्पष्ट भूमिका मांडली. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यात समन्वय साधून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. गोंदावले म्हणाले की, "कार्यालयात बसून शहराची परिस्थिती समजत नाही. प्रत्यक्ष फिल्डवर उतरल्याशिवाय वास्तव कळणार नाही." त्यामुळे शहरातील विविध भागांना भेट देऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्यावर प्राधान्याने उपाययोजना केल्या जातील. शहरातील घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि मूलभूत नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय साधून प्रभावी काम केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी सर्व विभागप्रमुखांकडून शहरासमोरील ठळक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला असून, अजूनही अनेक बाबींची सविस्तर माहिती घेणे बाकी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मनपातील रिक्त पदांबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. एकाच अधिकारी किंवा कर्मचाऱ्यावर अनेक विभागांची अतिरिक्त जबाबदारी असल्याने कामकाजाच्या गुणवत्तेवर आणि गतीवर निश्चितच परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मनपातील पदभरती हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून, रिक्त पदे भरण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक पाठपुरावा करून आवश्यक ती पावले उचलली जातील, असे त्यांनी सांगितले. प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

लोकप्रतिनिधींसोबत काम करण्याबाबत विचारले असता, "हा माझ्यासाठी नवीन अनुभव असेल. मात्र सर्वांना विश्वासात घेऊनच प्रशासन चालवले जाईल. शासन आणि प्रशासन यांच्यात योग्य समतोल राखण्याचा प्रयत्न केला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या प्रशासकीय कारकिर्दीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सेल्स टॅक्स आणि व्हॅट विभागातील कामाचा अनुभव वेगळा होता. त्या ठिकाणी स्वतंत्रपणे निर्णय घेऊन काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर ज्या-ज्या विभागात जबाबदारी मिळाली, त्या विभागांना विविध योजनांच्या माध्यमातून अधिक सक्षम आणि कार्यक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. आऊटसोर्स कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली. "जर आऊटसोर्स कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन आणि तेही वेळेवर मिळत नसेल, तर त्यांच्याकडून प्रामाणिक व गुणवत्तापूर्ण कामाची अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले. मूळचे सातारा जिल्ह्यातील असलेले डॉ. मंगेश गोंदावले यांनी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांना विश्वासात घेऊन अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, लोकाभिमुख प्रशासन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.

# चुडामणी नदीवरील देशमुखपुरा स्थित पुलाच्या सभोवताल सौंदर्यीकरण करा

प्रतिनिधी १३ जुलै



**वरुड :** वरुड शहरातील देशमुखपुरा येथे पुलाचे बांधकाम चालू असून त्या पुलाच्या आजूबाजूला खाली जागा उरलेली आहे. त्या जागेवर घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले असून त्यामुळे आम्हा वासीयांना ह्या घाणीच्या दुर्गंधी संपूर्ण परिसरात पसरत असून, देशमुखपुरा वासीयांच्या आरोग्य धोक्यात आले असून तसेच डुकरांचा (वराह) वाढता प्रकोप, डुकरांचा संपूर्ण परिसरात मुक्त वावर करतात आणि ती घाण पूर्ण पुलावरील परिसरात पसरवून ठेवतात. त्यामुळे परिसर हा अस्वच्छ राहत असून त्यावर आपण काही उपाययोजना कराव्यात व कचरा टाकण्यासाठी कचरा टाक्या योग्य ठिकाणी ठेवाव्यात. त्यामुळे कचरा व्यवस्थापन व्यवस्थित रित्या होईल व आरोग्यास धोका निर्माण होणार नाही.

तसेच वरिल पुलावरील खालि जागेत गाड्यांचे जोहे (गॅरेज/धुण्याचे ठिकाण), मोठ्या मोठ्या झाडांचे अतिक्रमण असे इत्यादी प्रकारचे अतिक्रमण होत आहे. उदा. कबुतर खाना / बकरी पालन कोंटा. हे असे वेगवेगळ्या प्रकारचे अतिक्रमण सुरुवात झालेली आहे. तरील वरिल गोष्टीवर लक्ष देऊन या गोष्टी निकालात काढाव्या.

तसेच पुलाच्या आसपास जागेवर ओपन ग्रीन पार्कची निर्मिती करणे. आपण जिम सारखे काही व्यायामाचे प्रकार आणून ठेवल्यास तिथे कोणीही अतिक्रमण करणार नाही व आपल्या नगरपालिकेला भविष्यात त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच पुलाच्या निकृष्ट बांधकामाबाबत हा पूल अजून एक वर्ष पूर्ण व्हायच्या आधीच पुलाच्या वरील स्लॅबचे कॉंक्रीटींग पूर्ण शिकस्त (खराब) झालेले आहे. या गोष्टीवर आपण लक्ष देणे आवश्यक आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता आपणास निदर्शनास आणू इच्छितो की, पुलाच्या आजूबाजूला जी खाली जागा आहे, त्या खाली जागेवर पेव्हर ब्लॉक लावल्यास सौंदर्गीकरणात भर पडेल. सा. बा. वि. (सार्वजनिक बांधकाम विभाग) अंदाजपत्रकात तशी तरतूद केली असेल, यावर आपण उपविभागीय अभियंता सा. बा. वि. वरुड यांच्याशी चर्चा करुन या सर्व गोष्टी निकालात काढाव्या (पुलाच्या). वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार करून आम्हा देशमुखपुरा वासीयांना योग्य न्याय द्याल अशी अपेक्षा बाळगतो.अशा आशयाचे निवेदन नगराध्यक्ष इंजिनीयर ईश्वर सलामे यांना नागरिकांनी दिले.

# श्री अमरनाथ ज्योतिर्लिंगाच्या पवित्र दर्शनासाठी भाविकांचे प्रस्थान

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती :** धार्मिक श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाने ओतप्रोत वातावरणात अमरावती येथील अनेक भाविक श्री अमरनाथ महादेवांच्या पवित्र दर्शन व पूजनासाठी रवाना झाले. यावेळी सर्व भाविकांनी भगवान भोलेनाथांच्या चरणी कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या सुख-समृद्धी, शांतता व सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.




या दर्शन यात्रेत सुरेंद्र सत्यनारायण चांडक, प्रदीप गोवर्धन राठोड, ऋषी धनराज खंडेलवाल, विकास सुरेंद्रजी केजरीवाल, भूमि ऋषी खंडेलवाल, मोनिका ऋषी खंडेलवाल, वर्षा सुरेंद्र चांडक, प्रीती योगेश राठी, मीना संतोष चांडक, वरुण सुरेंद्र चांडक तसेच संतोष शिवनारायण चांडक सहभागी झाले आहेत.

भाविकांनी सांगितले की, श्री अमरनाथ महादेवांचे पवित्र दर्शन लाभणे हे अत्यंत पुण्यदायी आणि अविस्मरणीय आहे. त्यांनी संपूर्ण देशातील नागरिकांच्या सुख, शांती, उत्तम आरोग्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. ही यात्रा आध्यात्मिक ऊर्जा, भक्तीभाव आणि प्रेरणादायी अनुभव देणारी असल्याची भावना सर्व भाविकांनी व्यक्त केली.

# डॉक्टरांवरील हल्ल्याचा निमाच्यावतीने निषेध

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती :** कर्तव्य बजावणाऱ्या डॉक्टरांवरील भ्याड हल्ला म्हणजे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवर हल्ला होय,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका संचलित शास्त्रीनगर रुग्णालयात कर्तव्य बजावत असलेल्या डॉक्टर, महिला डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या अमानुष व भ्याड हल्ल्याचा नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA) अमरावती तर्फे तीव्र शब्दांत निषेध करण्यात येत आहे.

सदर प्रकरणात रुग्णालयातील NICU (नवजात शिशु अतिदक्षता विभाग) पूर्ण क्षमतेने भरलेला असल्यामुळे संबंधित डॉक्टरांनी वैद्यकीय निकषांनुसार नवजात बाळाला अधिक चांगल्या उपचारासाठी अन्य सुसज्ज रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. हा निर्णय पूर्णपणे रुग्णाच्या हिताचा आणि वैद्यकीय नैतिकतेशी सुसंगत होता. परंतु या निर्णयाचा गैरसमज करून काही व्यक्तींनी रुग्णालयात घुसून डॉक्टर, महिला डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर मारहाण केली. या हल्ल्यात डॉ. वैभव साळुंखे जखमी झाले.

या संपूर्ण घटनेतील सर्वात वेदनादायी बाब म्हणजे, स्वतःवर जीवघेणा हल्ला होऊनही डॉक्टरांनी आपल्या वेदना बाजूला ठेवत रुग्णसेवेचे कर्तव्य सोडले नाही. त्यांनी नवजात बाळाला सुरक्षितपणे दुसऱ्या रुग्णालयात दाखल करून त्याच्या उपचाराची व्यवस्था केली. हीच डॉक्टरांच्या व्यवसायाची खरी ओळख आहे—स्वतःचे दुःख विसरून रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झटणे.

मात्र, अशा प्रकारच्या हिंसक घटना डॉक्टरांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करतात. एका डॉक्टरला भीतीमुळे राजीनामा देऊन शहर सोडावे लागणे, ही केवळ एका व्यक्तीची शोकांतिका नसून संपूर्ण आरोग्य व्यवस्थेसाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे. जर डॉक्टरच सुरक्षित नसतील, तर समाजाच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार?

डॉक्टर हे देव नाहीत; तेही सामान्य माणसे आहेत. ते दिवस-रात्र, सुट्ट्या-वार न पाहता रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असतात. अनेकदा अपुऱ्या सुविधा, मनुष्यबळाचा अभाव आणि प्रचंड ताणतणावाच्या परिस्थितीतही ते आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतात. अशा वेळी त्यांच्यावर हात उगारणे ही केवळ एका डॉक्टरची नव्हे, तर संपूर्ण मानवतेची आणि आरोग्य व्यवस्थेची अवहेलना आहे.

NIMA अमरावती शासनाला ठामपणे आवाहन करते की, डॉक्टरांवरील हल्ल्यांतील सर्व आरोपींवर कठोर आणि जलद कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

रुग्णालयांमध्ये डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी सुरक्षा व्यवस्था तातडीने उभारण्यात यावी.

डॉक्टर संरक्षणासंदर्भातील कायद्यांची कठोर अंमलबजावणी करून दोषींना तातडीने शिक्षा होईल, याची खात्री करण्यात यावी.

भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, यासाठी ठोस धोरण राबविण्यात यावे. NIMA अमरावतीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कृ. औगड म्हणाले, "डॉक्टरांवर होणारा प्रत्येक हल्ला हा संपूर्ण वैद्यकीय समाजावर आणि आरोग्य व्यवस्थेवर झालेला हल्ला आहे. रुग्णसेवा करताना डॉक्टरांच्या सुरक्षिततेची हमी देणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. डॉक्टर भयमुक्त वातावरणात काम करतील, तेव्हाच समाजाला दर्जेदार आणि निःस्वार्थ आरोग्यसेवा मिळू शकेल. अशा भ्याड हल्ल्यांना कोणतीही सभ्य समाजव्यवस्था कधीही समर्थन देऊ शकत नाही."

# मेहा पाटीलने आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत पटकावले विजेतेपद

**अमरावती :** मूळची महाराष्ट्राची आणि सध्या अहमदाबादमध्ये वास्तव्यास असलेली युवा टेनिसपटू मेहा पाटील हिने नैरोबी (केनिया) येथे झालेल्या ITF J30 (International Tennis Federation) आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत मुलींच्या एकेरीचे विजेतेपद पटकावून भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. याशिवाय तिने मुलींच्या दुहेरीत उपविजेतेपदही मिळवत स्पर्धेत दुहेरी यश संपादन केले.




मेहाचा विजेतेपदापर्यंतचा प्रवास अत्यंत संघर्षपूर्ण आणि प्रेरणादायी ठरला. सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये तिने प्रभावी विजय मिळवत आगेकूच केली. उपांत्यपूर्व फेरीत तिने केनियाच्या सुवर्णपदक विजेत्या बाथशेबा ओगाम्बा हिच्याविरुद्ध पहिला सेट 3-6 असा गमावला. मात्र त्यानंतर शानदार पुनरागमन करत तिने पुढील दोन सेट 7-5 आणि सुपर टायब्रेक 10-4 असा जिंकत उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर तिने स्पर्धेतील दुसऱ्या मानांकित कोर्टनी क्लेरेशा असीम्वे हिचा 6-2, 7-5 असा सरळ सेटमध्ये पराभव करून आपली क्षमता सिद्ध केली. उपांत्य फेरीत ग्रेट ब्रिटनच्या गिझेल जोली फिओरेन्टिनो हिलाही 6-3, 7-2 अशा सरळ सेटमध्ये पराभूत करत अंतिम फेरी गाठली. ४ जुलै २०२६ रोजी झालेल्या अंतिम सामन्यात भारताचीच दिया अग्रवाल हिच्याविरुद्ध अत्यंत रोमांचक लढत झाली. मेहाने पहिला सेट 6-4 ने जिंकला, मात्र दुसरा सेट 2-6 ने गमावला. निर्णायक तिसऱ्या सेटमध्ये ती 1-4 अशी पिछाडीवर होती.

# फायरिंगच्या गुन्ह्यातील आरोपी ताब्यात

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती:** फायरिंग च्या गुन्हयातील आरोपीचा पाठलाग करुन गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.




दिनांक १२ जुले फिर्यादी नितेश रमेशराव तायवाडे, वय ४५ वर्षे, रा. रतनगंज तिसरा नागोबा ओटा, अमरावती यांनी पो.स्टे. गाडगेनगर येथे तक्रार दिली की, नवसारी चौक येथे त्यांचे MP राजस्थान नावाचे ट्रान्सपोर्टचे दुकान आहे. दिनांक ११/०७/२०२६ चे सायंकाळी ७.३० वा. नवसारी चौक येथे आप्पाचे कॅन्टीवर चहा पिण्याकरीता गेले असता तेथे दोन इसम आले व फिर्यादी यांचेशी वाद केला व दोन्ही इसम तेथून निघून गेले व थोडया वेळाने परत येवून फिर्यादी यांना शिवीगाळ करून धमकी देत, धक्काबुक्की मारहाण करु लागले. फिर्यादी हे स्वतःला वाचविण्याचा प्रयत्न करीत असता त्यातील एकाने त्याचे जवळील धारदार शस्त्राने फिर्यादी यांच्या कमरेच्या खाली वार करुन जखमी केले व घटनास्थळावरून पळून गेले. अशा फिर्यादी वरून पो.स्टे. गाडगेनगर येथे अपराध क्रमांक ७४८/२०२६ कलम ११८ (२),११५(२), ३५२, ३५१(२), ३,५ बि.एन. एस. प्रमाणे गुन्हा नोंद आहे. अशा गंभीर घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा, अमरावती शहरचे अधिकारी व अंमलदार यांगी तात्काळ घटनास्थळास भेट दिली. आरोपीतांबाबत माहिती मिळवून आरोपींचे नाव व पत्ते निष्पन्न करण्यात आले असता त्यातील एक आरोपी हा यापुर्वि पो.स्टे. नागपूरीगेट येथे झालेल्या फायरिंगचे गुन्हयात फरार आहे व पो.स्टे. नागपूरीगेट अपराध क्रमांक ३२३/२०२६ कलम १०९, १८९(२), १९०, १९१(३), २९६, ६१ (२) बि.एन.एस. सहकलम ३, ४,२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ बि.पी. अॅक्ट, ७ फौ.का.अ. मधील पाहीजे असलेला आरोपी आहे. त्यानंतर सदर आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्यासाठी गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार यांना सक्रीय करुन, सापळा लावून तसेच आरोपींचा पाठलाग करुन घटनेच्या काही तासांतच यातील आरोपीतांना ताब्यात घेण्यात यश मिळविले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींना पुढील कारवाईकरीता पोलीस स्टेशन गाडगेनगर यांचे ताब्यात देण्यात आले.

# देशी गाय आणि जीवामृताचे सूत्र! खा. डॉ. अनिल बोंडेंनी रामटेकमध्ये उलगडले नैसर्गिक शेतीचे 'सत्य'

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती:** "रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा कस खालावत चालला असून, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. या चक्रव्यूहातून बाहेर पडायचे असेल, तर देशी गाय, बीजामृत, जीवामृत, आच्छादन आणि वापसा ही नैसर्गिक शेतीची पंचसूत्री शेतकऱ्यांनी अंगीकारली पाहिजे. विषमुक्त शेती आणि जमिनीचा पोत सुधारणे हीच आता काळाची गरज आहे," असे प्रतिपादन माजी कृषीमंत्री तथा राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.




भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा (नागपूर ग्रामीण, रामटेक जिल्हा) यांच्या वतीने रामटेक येथे आयोजित 'नैसर्गिक शेती कार्यशाळेत' ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. आपल्या भाषणात डॉ. बोंडे यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांचा दाखला दिला. पंतप्रधान मोदींनी देशात सातत्याने नैसर्गिक शेतीचे प्रयोग यशस्वी केले असून, गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले काम याचे उत्तम उदाहरण आहे. 'परंपरागत कृषी विकास योजना' अंतर्गत केंद्र सरकार नैसर्गिक शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून, शेतकऱ्यांनी आता या पारंपरिक आणि फायदेशीर पद्धतीकडे वळण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले. नैसर्गिक शेतीचे प्रत्यक्ष शेतातील सूत्र सांगताना डॉ. बोंडे यांनी शेतकऱ्यांना सविस्तर तांत्रिक माहिती दिली. देशी गाईंचे शेण आणि गोमूत्र हे शेतीसाठी अमृत असल्याचे सांगत त्यांनी बीजामृत, जीवामृत, आच्छादन आणि वापसा या पद्धती कशा वापराव्यात, हे समजावून सांगितले. स्थानिक पातळीवर 'अवजार बँक' निर्मिती, उत्पादन खर्च कमी करणे, एकात्मिक शेती पद्धती आणि बाजारपेठेचा अंदाज घेऊन विक्री करणे यावर त्यांनी भर दिला. आपल्या पूर्वजांप्रमाणेच करडी, झेंडू यांसारख्या फळ-फूल आधारित शेतीलाही मुख्य शेतीत स्थान देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# बडनेरा येथील उड्डाणपुलाचे उद्घाटन

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती :** भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा यांच्या खासदारकींच्या कारकिर्दिद अथक प्रयत्नातुन मंजुर झालेल्या 67 कोटी रुपयाचा जुनिवस्ती बडनेरा येथील उड्डाणपुलाचा भव्य लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री व अमरावती जिल्हयाचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते (ऑनलाईन) व्दारे राज्यातील 09 उड्डाणपुला पैकी बडनेरा येथील उड्डाणपुलाचे भव्य लोकार्पण आज करण्यात आले. आ.रवि राणा, YSP राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, भाजपा शहर अध्यक्ष नितीन धांडे, उपमहापौर सचिन भेंडे, YSP गटनेते नाना आमले, महारेल अधिकारी हुसैन सर, ए.डी.एम.राणे



साहेब, माजी महापौर संजय नरवणे, YSP जिल्हाअध्यक्ष प्रकाश साबळे, महिला जिल्हाअध्यक्षा सोनाली नवले यांची प्रमुख उपस्थितीलोकार्पण सोहळया दरम्यान बडनेरा शहरातील व अंजनगाव बारी येथील सामाजिक, शैक्षणीक, सांस्कृतीक व क्रिडा क्षेत्रामध्ये अतुलनिय कामगिरी करणा-यांना मान्यवरांचा आमदार रवि राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार सोबतच शेतकरी आंदोलनात सक्रीय सहभाग घेऊन शेतक-यांना न्याय मिळवुन देणारे तसेच बोगस बि-बियाणे देऊन शेतकऱ्यांची दिशाभुल करणाऱ्यांना कंपनीवर आंदोलनामुळे गुन्हे दाखल करुन कार्यवाही झाल्यामुळे YSP जिल्हाअध्यक्ष प्रकाश साबळे, सोनाली नवले, संजय भारसाकडे, मंगेश इंगोले, अजय घुले यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन केला सत्कार केला. बडनेरा जुनिवस्ती येथील लवकरच 8 दिवसात अंडरपासच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे आ.रवि राणा यांनी सांगितलं.

# 40 हजार कोटींच्या निर्णयाने राज्यातील बळीराजा चिंतामुक्त

## खा. डॉ. अनिल बोंडे गावागावांत शेतकऱ्याकडून देवेंद्र फडणवीसांचे आभार



### 40 हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची ऐतिहासिक कर्जमाफी

डॉ. बोंडे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना स्पष्ट केले की, महाराष्ट्राच्या राजकीय आणि कृषी क्षेत्राच्या इतिहासात ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची अशी विनाअट आणि व्यापक कर्जमाफी यापूर्वी कोणत्याही सरकारने केलेली नाही. हा निर्णय केवळ राजकीय नसून, राज्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक कणा बळकट करणारा आणि त्यांना पुन्हा एकदा आत्मविश्वासाने शेती करण्यासाठी सक्षम करणारा ठरला आहे.

### गावागावांत आनंदाचे वातावरण,

महायुती सरकारच्या या शेतकरीभिमुख निर्णयामुळे सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आणि गावागावांमध्ये कमालीचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्षानुवर्षे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या बळीराजाला या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. याच कृतज्ञतेपोटी राज्यातील गावागावांमध्ये शेतकरी बांधव स्वतःहून पुढे येत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारचे अत्यंत उत्साहात, पेढे वाटून आणि ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत करत असल्याचेही खा. डॉ. अनिल बोंडे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

प्रतिनिधी १३ जुलै

**अमरावती :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील बळीराजाला आतापर्यंत दिलासा देणारा एक अत्यंत ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला आहे. महायुती सरकारने जाहीर केलेल्या नवीन कर्जमाफी योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकरी चिंतामुक्त झाले असून, ही आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी ठरली आहे. या अभूतपूर्व निर्णयावर माजी कृषीमंत्री तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी महत्त्वपूर्ण भाष्य करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारचे जाहीर आभार मानले आहेत.

डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, "राज्यातील ज्या शेतकरी बांधवांचे ४ ते ५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज थकले आहे, त्या सर्व शेतकऱ्यांच्या कर्जाचे बँकेत थेट एकाच वेळी करून ते पूर्णपणे माफ केले जाणार आहे.

शेतकऱ्यांना आता कर्जमाफीसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची किंवा किचकट प्रक्रियेतून जाण्याची अजिबात गरज नाही. शेतकऱ्यांनी फक्त आपल्या बँकेत बसायचे आहे आणि आपले कर्ज पूर्णपणे माफ करून घ्यायचे आहे, इतकी सुटसुटीत पद्धत सरकारने आणली आहे."

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार, दि. १३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com








# न्यायालयाचा व आयुक्तांचा मिळाला शिक्का शिक्षकांच्या पदोन्नतीचा मार्ग झाला पक्का!

## *शिक्षकाच्या पदोन्नतीला न्यायालयाचे संरक्षण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मागील अनेक महिन्यांपासून वाशिम जि प च्या शिक्षकांच्या पदोन्नतीचे घोंगडे भिजत पडले होते. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न देखील रेंगाळला होता. परिणामी जिल्ह्यातील रिक्त जागांवर नव्या दमाचे शिलेदार मिळण्याची आशा मावळली होती. एकूणच शिक्षण विभागातील सगळीच कामे थंडबस्त्यात पडली होती. अगोदरचे परिपत्रक अगोदरचा आणि आताचा न्यायालयाचा निकाल. या दोन्ही बाबींचा विचार केल्यास ज्येष्ठता ही बदलणार नाही आणि ज्यांनी टीईटी पास केली त्यांच्यावरही अन्याय होणार नाही. एकूण शिक्षकांना न्याय मिळणार आहे. मात्र जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता वाढणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### पदोन्नतीमुळे होणार शैक्षणिक उन्नती

वाशिम जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सर्वप्रथम परीक्षा पास झालेल्या ३२ शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती दिली. त्यानंतर १०० टीईटी धारकांना दि.३ जुलै रोजी पदोन्नती दिली.या आठवड्यात सुमारे ८० ते ९० शिक्षकांचे समायोजन देखील करण्यात येणार आहे. त्यानंतर लगेच जिल्ह्यातील रिक्त जागांवर नव्या दमाचे तरुण तुर्क शिक्षकांची भरती प्रक्रिया शासन स्तरावर सुरू होईल.पदोन्नती आणि समायोन प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे ज्येष्ठ शिक्षकांबरोबरच टीईटी पास झालेल्या नवीन शिक्षकांनाही पदोन्नती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या सर्व प्रक्रियेत जिल्हा परिषद शाळेची सुधारणा व पदोन्नतीमुळे उन्नती होणार का याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### अनुभवाच्या व गुणवत्तेच्या सहयोगातून शिक्षणाची पताका उंच आकाशी फडफडणार

दि. ३ जुलै रोजी पार पडलेल्या पदोन्नती प्रक्रियेतून सन १९९१ च्या सेवाजेष्ठ आणि २०10 पर्यंतच्या तरुण शिक्षकांना पदोन्नती मिळाली.अर्थातच आता शिक्षण विभागात अनुभव व तरुण तुर्कांची गुणवत्ता एक सोबत शिक्षणाचा रथ ओढताना दिसणार आहे. त्यामुळे आगामी काळात शैक्षणिक गुणवत्ता वाढणार असल्याची शिक्षकांनी सांगितले.

जिल्ह्यातील शेकडो गुणवंत शिक्षक टीईटी व केंद्रप्रमुखांची परीक्षा पास झाले होते. पुरेशा प्रमाणात पात्रता धारक उपलब्ध असताना देखील प्रशासनाच्या धोरण लकव्यामुळे पदोन्नती प्रक्रिया जणू काही पंगू झाली होती. दि. १६ फेब्रु पासून सुरू केलेली शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया प्रशासनातील भेकाड अधिकाऱ्यामुळे काही लोकांनी वेठीस धरली होती. शेवटी दि. २२ जून रोजी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने टीईटी धारकांना पदोन्नतीस पात्र ठरवून सीटीईटी धारकांना अपात्र ठरवणारा निकाल दिला. मात्र शासकीय परिपत्रक व न्यायालयीन निर्णयानुसार जिल्हा परिषदेने केलेली भरती ही योग्य आहे. न्यायालयाच्या निकालानुसार जेष्ठ शिक्षण खांवरही न्याय होणार नाही. केंद्रप्रमुखांची परीक्षा पास झालेल्या शिक्षकांची रखडलेली पदोन्नती प्रक्रिया सीईओ अर्पित चव्हाण, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, उपशिक्षणाधिकारी कृष्णा बिरादार व गजानन डाबेराव इत्यादींनी प्रशासनाला गती देत सुमारे ३२ शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती दिली.दि.२२ जून रोजी मा.उच्च न्यायालयाने क्र.२५२४/२०२६ ही रीट पिटीशन निकाली काढताना टीईटी धारकांना पात्र ठरवले होते. त्या निकालाच्या आधारे शिक्षण विभागाने दि.३ जून रोजी सुमारे १० शिक्षकांना विस्ताराधिकारी, १६ शिक्षकांना केंद्रप्रमुख तर ७४ शिक्षकांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती दिली. त्यामुळे मागील पाच महिन्यांपासून दोन वेळा स्थगित झालेली पदोन्नती प्रक्रिया शेवटी यशस्वीरित्या संपन्न झाली.

### आयुक्तांचा व न्यायालयाचा शिक्का

दि. ३ जुलै रोजी संपन्न झालेल्या पदोन्नती प्रक्रियेवर चार शिक्षकांनी विभागीय आयुक्तांकडे आक्षेप नोंदवला होता. त्या आक्षेपांवर दि. ६ जुलै रोजी आयुक्तांसमक्ष सुनावणी झाली. या सुनावणीत विठ्ठल भुसारे, गजानन डाबेराव, मारुतकार व कांबळे यांनी कायदेशीर तरतुदींच्या आधारे सदर आक्षेप निराधार व निरर्थक असल्याचे सप्रमाण सिद्ध केले. त्यामुळे आयुक्तांनी संबंधितांचे आक्षेप धुडकावून लावले. सोबतच पार पडलेली पदोन्नती प्रक्रिया वैध असल्याचा निर्वाळा दिला. त्यानंतर तब्बल एका आठवड्याने दि. १० जुलै रोजी अमरावती जि प मधील पदोन्नती संदर्भातील ४५७४/२०२६ क्रमांकाच्या रिट पिटीशनचा निकाल देताना शिक्षण संचालकांचे दि. १४ मे रोजीचे पत्र रद्द ठरवले. तसेच दिनांक १० जुलै पूर्वी पार पडलेल्या सर्व पदोन्नत्या वैध ठरवून त्यांना संरक्षण देखील दिले. त्यामुळे वाशिमसह, नाशिक, बीड, हिंगोली, रत्नागिरी, अहिल्यानगर, धाराशिव व नंदुरबार इत्यादी जिल्ह्यात पार पडलेल्या पदोन्नती प्रक्रियांना न्यायालयीन संरक्षण मिळाले आहे.

---

## थोडक्यात

### शिवसेना(उ.बा.ठा)च्या रिसोड तालुकाप्रमुख पदी घनश्याम मापारी

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



तालुक्यातील सामाजिक व शेतकरी लढ्यासाठी सक्रिय सहभाग घेण्यासाठी सदैव तत्पर असणारे घनश्याम मापारी यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रिसोड तालुका प्रमुख पदी म्हणून निवड झाली.

सदर निवड शिवसेनेचे मुख्यपत्र सामना दैनिक कातून पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार जाहीर झाली.तसेच जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, माजी.तालुकाप्रमुख नारायण आरू व तालुका समन्वयक रिसोड, उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख, रिसोड विधानसभा सहसंपर्क प्रमुख विश्वनाथ सानप, यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटन मजबूत करून आगामी काळात सामाजिक कार्यात सहभागी असलेल्या तरुणांचा मोठ्या प्रमाणात पक्ष प्रवेश घडवून आणू अशी प्रतिक्रिया उपस्थित प्रतिनिधींशी बोलताना घनश्याम मापारी यांनी दिली.

### रघुपती राघव राजाराम सत्याग्रहाचे वाशिम येथे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार वाशिम येथे 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' आयोजित करण्यात आला आहे. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांच्या नावाने लूट करणाऱ्यांना सद्बुद्धी मिळावी, या उद्देशाने जिल्हा काँग्रेस कमिटी, वाशिमच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा सत्याग्रह मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम मंदिर, वाशिम येथे पार पडणार आहे. कार्यक्रमामध्ये प्रभू श्रीरामांची आरती, पसायदान, भजन तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजुभाऊ चौधरी यांनी ही माहिती दिली. या कार्यक्रमास काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, रामभक्त तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# करडा फिडरवर अतिरीक्त भार; वारंवार जळतेय विद्युत तार!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### गावातील वीजपुरवठा ठप्प * पाठपुरावा करूनही अधिकारी गप्प



रिसोड तालुक्यातील करडा येथील पिडरवर पाच गावांचा अतिरिक्त भार असल्याने वीजपुरवठा खंडीत होणे, विद्युत तार जळणे, रोहित्रात बिघाड, आदी प्रकार घडत असल्याने ग्रामस्थ वैतागले आहेत. याकडे महावितरणने लक्ष द्यावे, अन्यथा गावकऱ्यांसह महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. कारण अनेक वेळा निवेदने व तक्रारी करून नागरिकांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. तरी सुध्दा भ्रष्टअधिकाऱ्यांना खंत नसल्याने नागरिकांना आता आंदोलनाचा मार्ग पत्कारावा लागत आहे.

गेल्या पाच वर्षापासून करडा फिडरवर पाच गावांचा अतिरिक्त भार असल्यामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. विद्युत तार केबल जळणे, घरातील उपकरणे जळणे, रोहित्रामध्ये बिघाड होत आहे. सदैव संकटात असलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी विजेची आवश्यकता आहे. मात्र वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे.

#### सहनशिलतेचा संपला अंत, भ्रष्टअधिकाऱ्यांना नाही खंत...

**उन्हाळाभर विजेचा लपंडाव सुरूच होता आता तर, पावसाळा लागल्याने पाऊस येण्याअगोदरच विज पुरवठा बंद होतो. अनेक दिवस नागरिकांना अंधारातच राहावे लागते. निवेदने, तक्रारी देवून नागरिकांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. तरी सुध्दा भ्रष्ट अधिकाऱ्यांना त्यांची खंत नाही.**

याकडे महावितरणच्या अभियंत्यांनी येत्या दोन दिवसात लक्ष देऊन यशस्वी तोडगा काढावा, अन्यथा महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर गावकऱ्यांसह आंदोलन छेडण्याचा दिला आहे.

#### विद्युत खांब वाकले, महावितरण झोपले

करडा गावातील काही विद्युत खांब वाकल्याने तसेच जीवंत विद्युत तार लोबकळल्या असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. वीज देयक वसुलीसाठी तत्परता दाखविणाऱ्या महावितरणच्या अभियंत्यांनी विद्युत सेवा पुरविण्यातही तेवढीच तत्परता दाखवावी. असा सूर करडावासीयांमधून उमटत आहे. वीज खांब पडल्याने किंवा लोंबकळलेल्यार विद्युत तारेला कोणाचा स्पर्श झाल्याने जीवितहानी झाली तर या जबाबदार कोण? असा प्रश्न सरपंच गंगाताई देशमुख यांनी उपस्थित केला.

---

## जिल्हा न्यायालय परिसरात वृक्षारोपण



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा न्यायालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.१२ जुलै रोजी जिल्हा न्यायालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम होते. यावेळी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झपाटे आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनूप बाकलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे सदस्य तसेच न्यायालयीन कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिल्हा न्यायालय परिसरात सुमारे ७५ वृक्षांची लागवड करण्यात आली.वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. पर्यावरण संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

---

# भ्रष्टाचाराची चतुःसूत्री, वृक्षलागवड कागदोपत्री!



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वन विभागासह विविध विभागाच्या वतीने वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात ग्रामपंचायतीसह विविध कार्यालयात वृक्षारोपण करण्यासाठी लाखो रुपयाचा निधी उपलब्ध होतो. मात्र निधी पूर्ण आपसात लाटून व कागदोपत्री वृक्षारोपण दाखवून शासनाच्या विविध प्रकारच्या कार्यालयामध्ये निधी लाटण्याचा प्रकार बहुतांश ठिकाणी घडला असुन वृक्षलागवडीतली झाडे मेलीत मात्र सबंधीत निधी खिशात घालुन अधिकारी मात्र जगलेत हेच चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.तसेच तालुक्यात वृक्षारोपण फक्त कागदावरच दाखवले गेल्याचा प्रकारही झाल्याने याप्रकरणी चौकशी गरजेची असल्याची मागणी जोर धरत आहे. शासनाच्या वतीने शेतकोटी वृक्षलागवड योजना दरवर्षी राबविण्यात येते. त्यापैकी ५० ते ६० टक्केच रोपाची लागवड केली जाते. उर्वरित लागवड कागदोपत्री दाखवून निधी हडप केल्या जातो. अनेक जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. या योजनेत खासगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी आणि स्वयंमसेवी संस्थांच्या सहाय्याने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम पुर्ण करणे अपेक्षीत आहे. मात्र दरवर्षी शेकडो कोटी वृक्षलागवड होवूनही पुन्हा पुन्हा वृक्षलागवड योजना राबविली जाते. ही बाब म्हणजेच वृक्षलागवड योजना फक्त कागदोपत्रीच होत असल्याचे सिध्द होते. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. शुद्ध ऑक्सिजन, उन्हाळ्यात जनावरांना , माणसांना, व इतर पशुपक्ष्यांना सावली हवी आहे व ती काळाची सर्वांना गरज आहे.जर अधिकारी जबाबदारी घेत नसेल तर एकच लक्ष्य दोन कोटी वृक्ष महत्त्वाकांक्षी उपक्रमाला मुठमाती देऊन वृक्ष लागवडीत 'गोलमाल' करुन ही लागवड सुरू असल्याचा प्रकार होताना दिसत आहे.

#### अधिकारी जगलेत, झाडे मात्र मेली....



##### रोपवाटीकेतले वृक्ष गायब!

वनविभाग व जलसंपदा विभागामार्फत रापवाटीका योजना राबविण्यात येतात. मात्र या रोपवाटिकेतच वृक्ष नसल्यामुळे वृक्ष लागवड योजना कशी राबविणार असा प्रश्न पडला आहे. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

---

# सागवानसह आडजातीच्या झाडांची सर्रास तस्करी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### वनविभागाच्या दुर्लक्षाने राष्ट्रीय संपत्तीचे लाखो रूपयांचे नुकसान



तालुक्यातील पाळोदी, रूई, गोस्ता, शेंदुरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी आदी परिसरात जंगलाचे भाग असल्याने वनविभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे सागवान व आडजातीच्या झाडांची कत्तल होऊन लाकडांची सर्रास तस्करीहोत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सविस्तर वृत्त असे की, मानोरा तालुका हा डोंगराळ भागात वसलेला असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा संपत्तीने तालुका वेढलेला आहे. तालुक्यात रूई, गोस्ता, पाळोदी, रतनवाडी, शेंदुरजना (अढाव), आमदरी आदी परिसरात सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात आहे. येथील लाकडांचा दर्जा उच्च दर्जाचा असल्याने जिल्ह्याबाहेर लाकडाची मागणी होते. परंतु वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून अर्थपूर्ण व्यवहाराच्या माध्यमाने चोरट्या मार्गाने लाकडांची तस्करी करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने वन विभागाची जंगम मालमत्ता वृक्ष कटाईमुळे दिवसेंदिवस कमी होत आहे. मानोरा तालुक्यात पाळोदी, शेंदुरजना (अढाव) येथे डेपोची चौकी आहे मात्र वनविभागाचे अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने रात्रीच्या वेळी लाकडांची चोरट्या मार्गाने चोरी करणाऱ्यांना अभय मिळतो तसेच लाकडाची तस्करी करणारे व संबंधित यांची मर्जी असून आर्थिक देवाण घेवाणीचे समजते.

वनविभागाच्या भोंगळ कारभारामुळे राष्ट्रीय वनसंपत्तीचे लाखो रूपयाचे नुकसान होत असून पर्यावरणावर सुध्दा याचा परिणाम होत आहे. शासनाने लाखो रूपय खर्च करून जंगलात पाणलोट, वृक्ष लावगड असे विविध कार्यक्रम राबवून तळे खदुन जलसाठा जमिनीत निर्माण होऊन झाडे जगविण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करतो. सेच त्यावर पाहणी करण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मासिक वेतनाधर लाखो रूपये खर्च करून झाडांना जगवितात परंतु वरिष्ठांचे दुर्लक्ष व संबंधित मुख्यालयी राहत नसल्याने मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय संपत्तीची हानी होते. वरिष्ठांनी गांभीर्याने या सर्व प्रकारावर लक्ष केंद्रीत करून निसर्ग व पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता संबंधितांना सक्ती करण्याची मागणी निसर्ग प्रेमी नागरिकांच्या वतीने होत आहे.

---

# घोटा, चिखली, परिसरात वन्यप्राण्यांचा हैदोस!



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

खरीप हंगामासाठी मोठ्या उत्साहात पेरणी पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता वन्य प्राण्यांच्या वाढत्या उच्छादाने मोठे संकट उभे ठाकले आहे. रानडुक्कर, रोही, नीलगाय, व हरनासारखे प्राणी रात्रीच्या वेळी शेतात घुसून पेरले बियाणे उकरून खात असल्याने अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे चिखली, घोटा, परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

अलीकडील पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने सोयाबीन, तूर, कापूस आदी पिकांची पेरणी केली. मात्र वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे अनेक ठिकाणी पुन्हा पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. बियाणे, मशागत व मजुरीवर खर्च झाला जात असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.शेतकऱ्यांनी रात्री शेतात जागरण करून पिकांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न सुरू केला असला, तरी वन्य प्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वन विभागाने तातडीने प्रभावी उपाययोजना करून वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी चिखली, घोटा परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. १३ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# पाच तासांच्या थरारक रेस्क्यू ऑपरेशनला यश

## मलकापूर गोसेवा परिवाराच्या कार्यकर्त्यांनी दिले गोमातेला जीवनदान; गोसेवकाच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक





प्रतिनिधी १३ जुलै

**मलकापूर :** मलकापूर शहरातील हरीकिसन सोसायटी परिसरातील एका खुल्या प्लॉटमधील सुमारे 60 ते 70 फूट खोल विहिरीत पडलेल्या गोमातेला मलकापूर गोसेवा परिवाराच्या कार्यकर्त्यांनी तब्बल पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सुरक्षित बाहेर काढून जीवनदान दिले. या धाडसी बचावकार्यात गोसेवक विठ्ठल बोंबटकार यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता विहिरीत उतरून दाखविलेल्या साहसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मलकापूर शहरातील ग्रामपंचायत हद्दीतील हरीकिसन सोसायटी परिसरातील एका खुल्या प्लॉटमध्ये असलेल्या विहिरीला कोणतीही सुरक्षा भिंत किंवा संरक्षक कंपाउंड नसल्याने अन्नाच्या शोधात भटकत असलेली एक गाय रात्रीच्या वेळी त्या विहिरीत पडली. सकाळी प्लॉटची साफसफाई करण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीला विहिरीतील पाण्यात हालचाल दिसून आली. जवळ जाऊन पाहिले असता गाय विहिरीत पडल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने मलकापूर गोसेवा परिवाराच्या कार्यकर्त्यांना याची माहिती दिली.

सूचना मिळताच सकाळी सुमारे 9 वाजता गोसेवा परिवाराचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले. विहिरीची खोली अंदाजे 60 ते 70 फूट असल्याने गायीला थेट बाहेर काढणे शक्य नव्हते. त्यामुळे हायड्रा मशीनची मदत घेण्यात आली. मात्र, गायीला सुरक्षितरीत्या वर काढण्यासाठी प्रथम विहिरीत उतरून तिच्या शरीराला योग्य प्रकारे पट्टे बांधणे आवश्यक होते.

अशा धोकादायक परिस्थितीत गोसेवक विठ्ठल बोंबटकार यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता विहिरीत उतरून गायीला अत्यंत काळजीपूर्वक दोन मजबूत पट्टे बांधले. गायीला वर ओढताना कोणतीही अतिरिक्त इजा होऊ नये याची त्यांनी विशेष खबरदारी घेतली. त्यानंतर हायड्राच्या सहाय्याने गायीला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात आले.

हे संपूर्ण रेस्क्यू ऑपरेशन सकाळी 9 वाजल्यापासून दुपारी सुमारे 2 वाजेपर्यंत सुरू होते. अखेर गोमातेला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आल्याने उपस्थित गोसेवक, स्थानिक नागरिक आणि परिसरातील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, मलकापूरचे उपविभागीय पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भोळे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गायीची तपासणी केली असता ती गेल्या दोन दिवसांपासून विहिरीत अडकून असल्याचा अंदाज व्यक्त केला. पडल्यामुळे तिच्या शरीरावर अनेक ठिकाणी गंभीर दुखापती झाल्या होत्या. प्राथमिक उपचार करून पुढील उपचारांसाठी त्या गायीला गोरक्षण केंद्रात पाठविण्यात आले.

या घटनेनंतर मलकापूर गोसेवा परिवाराच्या कार्यकर्त्यांनी नागरिक, ग्रामपंचायत, नगरपालिका सदस्य आणि प्रशासनाला आवाहन केले आहे की, परिसरातील उघड्या विहिरी, खोल नाले तसेच सुरक्षा भिंत किंवा झाकण नसलेल्या धोकादायक ठिकाणांची तातडीने पाहणी करून आवश्यक सुरक्षाव्यवस्था करावी. अशा उपाययोजनांमुळे भविष्यात जनावरे तसेच लहान मुले व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही आणि संभाव्य दुर्घटना टाळता येतील. यावेळी दीपक चवरे,योगेश चौधरी, सुयोग शर्मा,घनश्याम राठी ,सूरज राजपूत, अक्षय चव्हाण, रामा मेहेसरे,कृष्णा सातव , गणेश किनेकर,पप्पू अग्रवाल ,दत्तू नारखेडे ,नितीन गावंडे, प्रदीप भारंबे, पप्पू संचेती, कुमार सर, इटनारे बंधू उपस्थित होते.

# खामगाव, शेगांव आगाराच्या बसेस भोटापर्यंत पुर्ववत सुरु करण्यात याव्यात

## मनविसेचे खामगांव, शेगांव आगार प्रमुख यांना निवेदन!

## बसेस पुर्ववत सुरू न झाल्यास मनसेचा आंदोलनाचा इशारा!!



प्रतिनिधी १३ जुलै

**नांदुरा:** तालुक्यातील भोटा येथील खामगांव, शेगांव आगाराच्या बसेस गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने भोटा व पंचक्रोशीतील विद्यार्थी, शेतकरी, व प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. यासंदर्भात आज ११ जुलै रोजी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने खामगांव, शेगांव आगाराच्या आगार प्रमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.

तसेच दिनांक २७ मार्च २०२६ रोजी खामगांव आगार प्रमुख यांना मनविसेने निवेदन सुद्धा दिले होते. परंतु सदर निवेदनाची दखल न घेतल्याने खामगांव आगार प्रमुख यांना स्मरणपत्र देण्यात आले. यावेळी दोन्ही आगार प्रमुख यांच्याशी मनसे पदाधिकारी यांनी चर्चा केली असता त्यांनी सकारात्मकता दर्शवली व लवकरच सदर बससेवा सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही दिली.

सविस्तर बातमी अशी आहे की भोटा येथे खामगांव आगाराची बससेवा सकाळी ०८:३० ला व सायंकाळी ०६:३० ला येत होती. तसेच शेगांव आगाराची सुद्धा बससेवा भोटा येथे सकाळी १०:०० वाजता व सायंकाळी ०५:०० वाजता येत होती. परंतु जलंब रेल्वे उड्डाणपूलाचे काम सुरू असल्याने सदर बससेवा गेल्या वर्षभरापासून बंद होती. आता खामगांव, शेगांव आगाराच्या अनेक बसफेर्या जलंब , माटरगांव, भेंडवळ पर्यंत सुरू झालेल्या आहेत. अशातच भोटा येथील बससेवा बंद असल्याने येथील विद्यार्थी, शेतकऱ्यांना, श्री संत गजानन महाराज भक्तांना व इतरही प्रवाशांना शेगांव,खामगांव जाण्यासाठी खाजगी वाहनाने जावे लागते अशातच बससेवा उपलब्ध नसल्याने खासगी वाहन चालक प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारत आहेत. त्यामुळे मनसे पदाधिकारी यांनी दोन्ही आगार प्रमुख यांना निवेदन दिले व यावेळी सकारात्मक चर्चा झाली. सदर बससेवा सुरू करण्यात येणार असल्याचे यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले आहे.

सदर निवेदन देते वेळी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष अमित देशमुख,महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे उपजिल्हाध्यक्ष शिवचरण पारस्कर, मनविसे जिल्हा सचिव राहुल चोपडे, मनसे खामगांव शहराध्यक्ष आकाश पाटील, मनसे शेगांव तालुकाध्यक्ष नितीश भावरकर, शेगांव शहराध्यक्ष परमेश्वर लाहुडकार, शेगांव वाहतूक सेना शहराध्यक्ष राम इंगळे,विभाग प्रमुख धनंजय लोखंडे,भोटा सरपंच पती कडू भोटकर ज्ञानेश्वर नंदाने, समाधान शेगोकार, किरण शेगोकार, वैभव देशमुख,सागर लांजुळकर सह मनसे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक यावेळी उपस्थित होते.

# नांदुरा पंचायत समितीसमोर अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे धरणे आंदोलन

## विविध मागण्यांसाठी सरकारविरोधात एल्गार

प्रतिनिधी १३ जुलै

**नांदुरा:** भारतीय अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या वतीने मागणी दिन आणि आशा वर्कर्स व गटप्रवर्तक संघर्ष समितीच्या देशव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवार दि.१० जुलै रोजी नांदुरा पंचायत समिती कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. संघटनेच्या तालुकाध्यक्ष ललिता बोदडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलनपारपडले.

यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका व गटप्रवर्तकांनी केंद्र व राज्य शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपल्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.गेल्या अनेक वर्षांपासून अत्यल्प मानधनावर सेवा बजावत असूनही महागाईच्या काळात मानधनात समाधानकारक वाढ करण्यात आलेली नाही. तसेच सामाजिकसुरक्षा,पेन्शन,ग्रॅच्युइटी, विमा, प्रवास भत्ता आणि सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याची मागणी आंदोलकांनीकेली.

आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. अंगणवाडी सेविका व मदतनीसांनासरकारीकर्मचाऱ्यांचा दर्जा, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा,ई-श्रम सुविधा,निवृत्तीवेतन, ऑनलाइन कामांचा स्वतंत्र मोबदला, प्रोत्साहन भत्ता आणि आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर करण्याची मागणी निवेदनातूनकरण्यातआली.

यावेळी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सरकारने मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला. आंदोलनात तालुक्यातील मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका आणि गटप्रवर्तकसहभागीझाले.

# अज्ञात चोरट्यांचा घरावर डल्ला; 4 लाख 24 हजार रुपयांचा सोन्या-चांदीचा ऐवज केला लंपास

प्रतिनिधी १३ जुलै

**मलकापूर:** शहरातील नंदनवन नगर परिसरात सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक यांच्या बंद घरावर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत तब्बल ४ लाख २४ हजार रुपयांचा सोन्या-चांदीचा ऐवज व रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुभाष प्रल्हाद पहुरकर (वय ६०), रा.अग्रवाल टेन्ट हाऊसजवळ, नंदनवन नगर, मलकापूर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, ११ जुलै रोजी दुपारी १२ ते रात्री ८ वाजेदरम्यान ते नातेवाईकांना भेटण्यासाठी बाहेरगावी गेले होते. घरी परतल्यानंतर मुख्य दरवाज्यावरील कडीकोंडा जागेवर असला तरी कुलूप नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात जाऊन पाहणी केली असता कपाटातील दोन सोन्याच्या बागड्या वजन अंदाजे ४ तोळे किंमती अंदाजे १ लाख २० हजार रू., सोन्याची सौभाग्यवती पोथ वजन अंदाजे ४ तोळे किमती अंदाजे १ लाख २० हजार रू., सोन्याची चैनसारखी पोथ वजन अंदाजे ३ तोळे किमती अंदाजे ९० हजार रू.,लहान पोथ वजन अंदाजे १ तोळा किमंती अंदाजे ३० हजार रू., सोन्याची गोल रींगची अंगठी वजन अंदाजे ४ ग्रॅम किमंती अंदाजे १२ हजार रू., चांदीच्या चैनपट्ट्या दोन जोड वजन अंदाजे ६ तोळे किमंती अंदाजे १२ हजार रू.,नगदी ४० हजार रूपये असा एकूण ४ लाख २४ हजार रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे आढळून आले. याप्रकरणी मलकापूर शहर ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अप.नं. ५१५/२०२६ अन्वये कलम ३०५, ३३१(३) व ३३१(४) बीएनएसएस अंतर्गत अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शुभम बरदाडे करीत आहेत.

# पावसाच्या उघडीपमुळे शिवारात पुन्हा खोळंबलेल्या पेरण्यांची लगबं; बळीराजाला दिलासा

प्रतिनिधी १३ जुलै

**मेरा बु.:** यावर्षी मृग नक्षत्र संपल्यानंतर पावसाने दमदार हजेरी लावली. मात्र त्यानंतर सलग सुरू असलेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या होत्या. त्यामुळे पेरणी कशी करावी, या चिंतेने शेतकरी हवालदिल झाले होते. अखेर गेल्या दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी रखडलेल्या पेरण्यांना पुन्हा सुरुवात केली असून बळीराजा सुखावला आहे.

चिखली तालुक्यातील गुंजाळा परिसरातील बहुतांश शेती कोरडवाहू वडोंगराळ स्वरूपाची आहे. त्यामुळे येथील शेतकरी दरवर्षी मृग नक्षत्र सुरू होण्यापूर्वीच धूळपेरणी करतात. मागील वर्षी १० ते २५ जूनदरम्यान बहुतांश पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. मात्र यावर्षी मृग नक्षत्रात पावसाने दडी मारल्याने मृग कोरडे गेले आणि पाऊस पडणार की नाही, या चिंतेने शेतकरी ग्रासले होते. शेतकऱ्यांनी शेतीची मशागत करून पेरणीसाठी शेत तयार ठेवले होते. तसेच खत व बियाण्यांचाही साठा करून ठेवला होता. मृग नक्षत्र संपताच पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे सुरुवातीला आनंदाचे वातावरण निर्माण झाले; मात्र त्यानंतर सलग पडणाऱ्या पावसामुळे शेतात सर्वत्र पाणी साचले आणि पेरणीची कामे ठप्प झाली. सततच्या पावसामुळे ट्रॅक्टर शेतात उतरू शकत नव्हते. तसेच बैलांच्या साहाय्यानेही पेरणी करणे शक्य होत नव्हते. आता पावसाने उघडीप दिल्याने ट्रॅक्टरऐवजी अनेक ठिकाणी बैलांच्या साहाय्याने पेरणी करण्याची वेळ आली आहे. बैलांची संख्या कमी झाल्याने बैलधारकांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या घरात खत व बियाणे तसेच पडून होते. ज्या शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली आहे, त्या ठिकाणी कपाशीची उगवण चांगली झाली आहे. मात्र पेरण्या आणखी उशिरा झाल्यास खरीप हंगामावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती.

# बाबासाहेब महाजन स्मृतीवनात 101 वृक्षांचे रोपण

प्रतिनिधी १३ जुलै

**बुलढाणा :** बुलढाणा नगरपालिका माजी उपाध्यक्ष तथा बुलढाणा एज्युकेशन महाजन सोसायटीचे माजी उपाध्यक्ष कै. बाबासाहेब स्मृतीवन तयार करून 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाअंतर्गत साखळी शिवारात १०१ विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

सदर उपक्रम राष्ट्रीय हरित सेना एडेड हायस्कूल बुलढाणा, ग्रामपंचायत साखळी व सामाजिक वनीकरण विभाग बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमानाने साखळी शिवारात १० जुलै रोजी राबवण्यित आला. यावेळी सहायक

वनसंरक्षक अधिकारी पुजा पानसरे, साखळी सरपंच सौ. सुनिता भगत, माजी सरपंच सुरेश चौधरी, शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद देशपांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. तुषार महाजन, सचिव अ‍ॅड. रामानंद कविमंडन, संचालक अ‍ॅड. आनंद चेकेटकर, तो. सी. उबरहंडे, मुख्याध्यापक किंबहूने, आर. एन. जाधव, हरित सेना प्रमुख तोमर व हरित सेनेचे विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# श्री महादेव गोरक्षण संस्थान, आमसरी येथे 550 गोवंशांचे लंपी रोगावरील लसीकरण

प्रतिनिधी १३ जुलै

**नांदुरा :** श्री महादेव गोरक्षण संस्थान, आमसरी येथे गोवंशांना लंपी (Lumpy Skin Disease) या आजारापासून संरक्षण मिळावे यासाठी दिनांक 10 जुलै रोजी मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५५० गोवंशांचे यशस्वीरीत्या लसीकरण करण्यात आले.

ही मोहीम खामगाव येथील पशुसंवर्धन विभागाच्या सहाय्यक उपायुक्त सौ. अंजलीताई सोनफुले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेचे संचालक व कोषाध्यक्ष रविंद्रसिंह ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडली. पशुसंवर्धन विभागाचे राठोड साहेब, गोरक्षण संस्थेला सातत्याने सेवा देणारे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आकाश देशमुख व त्यांच्या सहकारी चमूने ही मोहीम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



यावेळी गोरक्षण संस्थेचे कर्मचारी नर्सिंग, राकेश तसेच इतर कर्मचाऱ्यांनीही लसीकरण मोहिमेत सक्रिय सहभाग घेत गोवंशांना सुरक्षितपणे लसीकरण करून घेण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. श्री महादेव गोरक्षण संस्थेमध्ये नोंदणीकृत १,१३१ गोवंश असून, त्याशिवाय नोंदणी न झालेले सुमारे ३०० लहान-मोठे गोवंश आहेत. अशा प्रकारे संस्थेत एकूण अंदाजे १,३०० ते १,४०० गोवंशांचा सांभाळ करण्यात येत आहे. आजच्या टप्प्यात ५५० गोवंशांचे लसीकरण पूर्ण झाले असून उर्वरित गोवंशांचे लसीकरण येत्या दोन दिवसांत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली. गोवंशांना लंपी रोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी वेळेत लसीकरण करणे अत्यंत आवश्यक असून, या मोहिमेमुळे गोरक्षण संस्थेतील सर्व गोवंशांचे आरोग्य अधिक सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे.

# श्री सद्गुरु श्रीधर महाराज पुण्यतिथीनिमीत्त निघालेल्या पालखीचे सानंदा परिवाराच्या वतीने स्वागत

प्रतिनिधी १३ जुलै



**खामगाव:** श्री सद्गुरु श्रीधर महाराज सेवा मंदिर घाटपुरी यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सद्गुरु श्रीधर महाराज यांच्या 50 व्या पुण्यतिथीनिमित्त दि.05 जुलै ते 12 जुलै 2026 पर्यंत श्री सद्गुरु श्रीधर महाराज संस्थान घाटपुरी येथे श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.वेदांताचार्य 1008 स्वामी वासुदेवानंद सरस्वती महाराज,(गुरुकुल उत्तरकाशी हिमाचल) यांच्या अमृतवाणीतुन सकाळी 10 ते 1 व दुपारी 3 ते 5 वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथेचे वाचन करण्यात आले. तसेच सप्ताहा दरम्यान दररोज रात्री 8 ते 10 वाजेपर्यंत नामवंत किर्तनकारांची किर्तने सुध्दा पार पडली. रविवार दि.12 जुलै 2026 हा पुण्यतिथी महोत्सवाचा प्रमुख दिवस होता. या दिवशी सकाळी 9 ते 11 वाजेपर्यंत वासुदेवानंद महाराज यांचे काल्याचे किर्तन पार पडले. याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी श्रीधर महाराज संस्थान येथे उपस्थित राहुन श्रीमद् भागवत ग्रंथाचे पुजन करुन दर्शन घेतले तसेच श्रीधर महाराज मंदिरामध्ये जावुन श्रीधर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत धनंजय वानखडे,युवराज भेरडे हे उपस्थित होते. काल्याच्या किर्तनानंतर आरती होवुन भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या महाप्रसादाचा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला. दुपारी 3 वाजतापासुन श्रीधर महाराज संस्थान घाटपुरी येथुन बॅन्डच्या निनादात अश्व,उंट व दिंडी , पताका,टाळकरी,वारकऱ्यांसह श्रीधर महाराज यांच्या पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत ही शोभायात्रा सानंदा निकेतन समोर आली असता माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा,सौ. सवितादेवी सानंदा,माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी श्रीधर महाराजांच्या पालखीचे पुजन करुन दर्शन घेतले.तसेच श्रीमद् भागवत कथा वाचक स्वामी वासुदेवानंद महाराज यांचा शाल व पुष्पहार घालुन सत्कार केला व पेढा भरवुन त्यांचे तोंड गोड केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार गुरुजी,संजय शर्मा,युवराज भेरडे,दशरथ चऱ्हाटे,ह.भ.प.श्रीराम महाराज खेडकर,ह.भ.प.रविंद्र महाराज खेडकर आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी श्रीधर महारासंस्थानच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा व माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा यांचा शाल व पुष्पहार घालुन सत्कार केला.श्रीधर महाराजांच्या पालखीमध्ये सहभागी झालेल्या शेकडो भाविक भक्तांना सानंदा परिवाराच्या वतीने थंड पाणी व चहाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष आटोळे, आदींनी परिश्रम घेतले.

# पेस्ट कंट्रोल केल्याच्या बोगस प्रमाणपत्राचा आधार

## अन्न व औषध प्रशासनाच्या डोळ्यात धुळ फेकण्याचा व्यवसायिकांचा प्रकार

## हॉटेल बियर बार आणि दूध डेअरी च्या तपासणीची मागणी

प्रतिनिधी १३ जुलै



**अकोला:** राज्यात अन्न व औषध प्रशासनाचा कारभार तुकाराम मुंडे सारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने घेतल्यानंतर खाद्यपदार्थात भेसळ करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे. नियमांचे पालन करणाऱ्या मोठमोठ्या व्यवसायिकांवर राज्यात कारवाया सुरू आहेत. आता इतकेच नाही तर शहरातील हॉटेल्स बार आणि रेस्टॉरंट साठी तसेच दूध डेअरी साठी पेस्ट कंट्रोल केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. यावर तोडगा काढण्यासाठी तसेच कारवाईतून वाचण्यासाठी आपल्या दुकानांमध्ये पेस्ट कंट्रोल केल्याचे बनावट प्रमाणपत्र तयार होऊ लागली आहेत. हॉटेल्स, बार आणि रेस्टॉरंट जिथे अन्न दिले जाते किंवा तयार केले जाते त्यांच्या भोजन कक्षामध्ये अनेकदा झुरळ, उंदीर, आणि माशांचा सुळसुळाट आढळतो. पेस्ट कंट्रोल केल्याने या समस्यांवर नियंत्रण मिळवता येऊ शकते. यामुळे या सर्व व्यावसायिकांना पेस्ट कंट्रोल अनिवार्य केल्यामुळे काही तथाकथित पेस्ट कंट्रोल कंपन्या कोणतेही पेस्ट कंट्रोल न करता कमी शुल्क आकारत आहेत आणि त्या व्यवसायिकांना प्रमाणपत्र देत आहेत. या प्रमाणपत्रांमुळे अपेक्षित पेस्ट कंट्रोल उपायोजनांना अडथळा येत आहे. पेस्ट कंट्रोल नियंत्रण सेवा पुरवणाऱ्या संस्थांसाठी नोंदणी, परवाना, आणि लागू कायद्याचे पालन करणे अनिवार्य आहे. पेस्ट कंट्रोल कायद्यामध्ये सामग्रीचा वापर आणि साठवणुकीबाबत विशिष्ट तरतुदी आहेत. परंतु या नियमांना धाब्यावर बसवीत काही पेस्ट कंट्रोल कंपन्यांकडून बनावट पेस्ट कंट्रोल प्रमाणपत्र जारी केली जात आहेत. बनावट प्रमाणपत्रे तयार करणे आणि इतर फसवणुकीच्या कृत्यांसाठी दंडाची तरतूद आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या कंपन्यांची चौकशी करून त्यांचे पितळ उघडे पाडण्याची मागणी नागरिक करत आहेत

# विशेष मतदार यादी: 2002 च्या मतदार यादीत नाव नाही घाबरू नका

## आई-वडिलांची किंवा आजी-आजोबांची कागदपत्रे देखील स्वीकारली जातील नाव वगळल्यास सुनावणीदरम्यान कागदपत्रे सादर केली जाऊ शकतात

प्रतिनिधी १३ जुलै



**अकोला:** शहरात विशेष मतदार यादी सुधारणा (SIR) प्रक्रिया वेगाने पुढे जात आहे. विशेष मतदार यादी सुधारणेबाबत (SIR) जनतेमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण आहे. २००२ च्या मतदार यादीत नाव नसल्यास नागरिकत्व गमावण्याची भीती लोकांना वाटत आहे. तथापि, मतदार यादीत नाव नसले तरी घाबरण्याची गरज नाही. २००२ च्या मतदार यादीत नाव नसल्यास, सुनावणीदरम्यान आई-वडिलांची किंवा आजी-आजोबांची कागदपत्रे वैध मानली जातील. ३० जुलैपर्यंत, बीएलओ (BLO) मतदारांना अर्ज वाटण्यासाठी घरोघरी जातील. बीएलओ मतदारांना दोनदा भेट देतील. मतदार हा अर्ज भरून बीएलओकडे परत करतील. मतदारांनी त्यावर आपला फोटो लावणे आवश्यक आहे. मतदाराचे नाव २००२ च्या यादीत असणे आवश्यक आहे. जर तुमचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल, तर तुमच्या आईवडिलांची किंवा आजी-आजोबांची नावे मतदार यादीत असली तरी, घाबरण्याची गरज नाही. तुमच्या आईवडिलांची किंवा आजी-आजोबांची नावे देशाच्या कोणत्याही भागात असली तरी, घाबरण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे, मतदार देशाच्या कोणत्याही भागातून आलेला असला आणि त्याला आपले नाव कुठे समाविष्ट करायचे हे निवडणे त्यांच्या विवेकबुद्धीवर अवलंबून आहे.

### सप्टेंबरमधील सुनावणी:

ज्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांच्यासाठी सप्टेंबरमध्ये सुनावणी आयोजित केली जाईल. सुनावणीदरम्यान, मतदारांना त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ १२ प्रकारची कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल: आई-वडिलांची, आजी-आजोबांची नावे, घर, सरकारी कागदपत्रे, पासपोर्ट, सरकारी नोंदी, सरकारी ओळखपत्र, शाळेची प्रमाणपत्रे इत्यादी. वडिलोपार्जित जमिनीची कागदपत्रे देखील पुरावा म्हणून सादर केली जाऊ शकतात. संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी दिली जाईल. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की घाबरण्याची गरज नाही. एक जरी वैध कागदपत्र स्वीकारले जाईल आणि कोणत्याही पात्र व्यक्तीचे नाव वगळले जाणार नाही.

# दुर्गा चौकात पुलाच्या रपट्याचे काम अर्धवट

## येणाऱ्या जाणाऱ्यांची प्रचंड गैरसोय




प्रतिनिधी १३ जुलै

**अकोला :** दुर्गा चौकात पुलाच्या रपट्याचे काम करण्यात आले. परंतु ते अर्धवट सोडल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बाजूला बांधकाम साहित्य तसेच पाण्याचा टँकर उभा असतो. त्यामुळे गर्दीच्या वेळी येथून वाट काढणे कठीण आहे. संबंधित कंत्राटदाराकडून बांधकाम विभागाने काम पूर्ण करवून घ्यावे अशी मागणी केली जात आहे. दुर्गा चौकातील रस्ता सतत वाहता असतो. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. काम सुरू करून मध्यंतरी रेंगाळले होते. त्यामुळे नागरिकांची अडचण झाली. सध्या पाऊस थांबला आहे. त्यामुळे राहिलेले काम पूर्ण करावे आणि नागरिकांचा दररोजचा त्रास दूर करावा अशी मागणी जोर धरत आहे.

# टॉवर चौकातील सौंदर्यस्थळांचे झाले विद्रूपीकरण



प्रतिनिधी १३ जुलै

## स्टील पाईपची झाली चोरी मनपाचे दुर्लक्ष

**अकोला :** टॉवर चौक शहराची ओळख आहे. या चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. एक महिला आपल्या मुलीला खेळवत आहे असा पुतळा उभारला आहे. अतिशय सुंदर असे दृश्य येणाऱ्या जाणाऱ्यांना दिसायचे. परंतु आता पुतळ्याच्या भोवती लावलेले स्टील पाईप चोरीला गेले. स्वच्छतेकडे लक्ष दिले जात नाही. महापालिका यंत्रणेचे दुर्लक्ष दिसते. टॉवर चौकच नाही तर शहरातील मुख्य चौकांचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. हजारो रुपये त्यावर खर्च झाला. परंतु आता सौंदर्य स्थळांची रया गेलेली दिसते. टॉवर चौकातील सौंदर्य स्थळाकडे महापालिका प्रशासनाचे देखील दुर्लक्ष दिसते. येथील पुतळ्याच्या भोवती लावलेले स्टील पाईप चोरीला गेले. यावर झालेला हजारोचा खर्च वाया गेलेला दिसतो.

# तेजग्रंथ रथाला मूर्तिजापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद



प्रतिनिधी १३ जुलै

**मूर्तिजापूर :** सरश्री यांच्या प्रेरणेतून मनन आश्रमद्वारे नियोजित तेजग्रंथ रथ शहरातील ज्ञान ध्यान केंद्रात ग्रंथ दाखल झाला. सरश्री लिखित अध्यात्म, आत्मविकास, ध्यान, जीवनमूल्ये आणि सकारात्मक विचारांवरील विविध विषयांचे ग्रंथ या प्रदर्शनात उपलब्ध करून देण्यात आले होते. तेजग्रंथ रथाचे आगमन भक्तिमय वातावरणात करण्यात आले. यावेळी तेजसेवकांनी रथाचे उत्साहात स्वागत करत ज्ञानप्रसाराचा संदेश दिला. त्यानंतर तेजग्रंथ रथ शहरातील विविध भागांत नेण्यात आला. आध्यात्मिक ज्ञानाची आवड असलेल्या नागरिकांनी तेजग्रंथांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध ग्रंथांची खरेदी केली. आत्मपरिवर्तन, सकारात्मक जीवनशैली आणि अंतर्मनाच्या विकासाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे शहरवासीयांनी स्वागत केले. तेजसेवकांनी या उपक्रमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प केला.

# अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्तपदी डॉ. मंगेश गोंदावले रुजू

प्रतिनिधी १३ जुलै



**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले (भा.प्र.से.) यांनी आज पदभार स्वीकारला. माजी आयुक्त वर्षा लढ्ढा यांच्याकडून त्यांनी अधिकृतरित्या कार्यभार स्वीकारत शहराच्या सर्वांगीण, शाश्वत व नागरिकाभिमुख विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. गोंदावले यांनी सांगितले की, अमरावती शहराच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून कार्य केले जाईल. महानगरपालिकेअंतर्गत सुरू असलेले विविध विकास प्रकल्प, स्वच्छता, पायाभूत सुविधा, नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य देत विकासकामांना अधिक गतिमान करण्यात येईल. नागरिकांच्या अपेक्षांनुसार संवेदनशील, उत्तरदायी आणि लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी माजी आयुक्त वर्षा लढ्ढा यांनी आपल्या कार्यकाळात अधिकारी व कर्मचारी वर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. महानगरपालिकेची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी समन्वय, जबाबदारी आणि लोकाभिमुख दृष्टीकोन ठेवून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच डॉ. मंगेश गोंदावले यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत अमरावतीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या कार्यकाळास यश लाभो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# वडाळी येथे शेतातून चार म्हशी चोरीला..

प्रतिनिधी १३ जुलै

**नांदुरा :** वडाळी येथील शेतकरी निलेश वक्टे यांच्या शेतातून शनिवारी (दि. ११ जुलै २०२६) मध्यरात्रीच्या सुमारास चार म्हशींची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीच्या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून जनावरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलेश वक्टे यांच्या शेतात बांधून ठेवलेल्या म्हुरा जातीच्या चार म्हशी अज्ञात चोरट्यांनी रात्री अंदाजे १ वाजताच्या सुमारास चोरून नेल्या. सकाळी शेतात गेल्यानंतर म्हशी जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. आजूबाजूच्या परिसरात शोधाशोध करूनही जनावरांचा कोणताही मागमूस लागला नाही. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. दरम्यान, परिसरातील शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढविण्याची तसेच जनावरांच्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# अ.भा. कुणबी समाज बहु. मंडळाचा कार्यक्रम

## पालकमंत्र्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**अकोला :** अ.भा. कुणबी समाज बहु. मंडळ यांच्यातर्फे अकोला जिल्ह्यातील कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा व समाज मेळावा राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत आज जि. प. कर्मचारी भवन येथे झाला. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर होते. संतोष शिवरकार, राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. शुकदास महाराज गाडेकर यांच्यासह अ.भा. कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. समाजातील १० वी, १२ वी, तसेच जेईई, नीट, एमएचटी सीईटी, एनटीएस, शालेय शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यापीठ, राज्यस्तरीय विविध परीक्षा, कला-क्रीडा, साहित्य संगीत आदी क्षेत्रातील अभ्यासक्रम व उपक्रम, एमपीएससी यूपीएससी, एमबीबीएस, एमडी आदी अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा यात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री यांनी गुणवंतांशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच मंडळाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी प्रा. श्रीकांत लांडे यांनी मार्गदर्शन केले.

# काँग्रेसची शिस्तपालन समिती गठित; अध्यक्षपदी माजी आ. कीर्तीबाबू गांधी



**उमरखेड :** जिल्हा काँग्रेसमधील संघटनात्मक शिस्त अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी त्रिसदस्यीय शिस्तपालन समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी काँग्रेसचे माजी आमदार कीर्तीबाबू गांधी यांची नियुक्ती करण्यात आली असून, ज्येष्ठ नेते नंदकिशोर अग्रवाल आणि टीकाराम कोंगरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. २९ जून रोजी झालेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीतील ठरावानुसार ही समिती गठित करण्यात आली. पक्षातील शिस्त राखणे, संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावी करणे तसेच बेशिस्तीच्या घटनांवर नियंत्रण ठेवणे, ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल, असे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार समिती तात्काळ प्रभावाने कार्यरत झाली आहे. पक्षनिष्ठ, अनुभवी आणि शिस्तप्रिय पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आल्याने काँग्रेसच्या संघटनात्मक कामकाजाला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दोन बोगस बियाणे कंपन्यांविरुद्ध गुन्हा दाखल

## अकोल्यातील दोन पोलिस स्टेशन अंतर्गत कारवाई

प्रतिनिधी १३ जुलै




**अकोला :** जिल्ह्यात बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने कठोर कारवाई सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात रवी सीड्स रिसर्च प्रा. लि. ताराविल्ला, ता. अलोट, जि. रतलाम (मध्य प्रदेश) तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्यात एजबुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि., गेवराई बाजार जि. जालना या दोन 'रवी सीड्स रिसर्च' व बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स कंपन्यांचा समावेश आहे. कंपन्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बियाणे कायदा, जीवनावश्यक वस्तू अधिनियम तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. कृषी विभागाच्या या कारवाईमुळे बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अकोला जिल्हा परिषदेतील मोहीम अधिकारी तथा बियाणे निरीक्षक महेंद्र अच्युतराव सालके यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रवी सीड्स कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीत दोष आढळल्या प्रकरणी बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि., गेवराई बाजार (जि. जालना) या कंपनीविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्ह्यातील सात तालुक्यांतून १९१ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर १३ बियाणे नमुने प्रयोगशाळेत अप्रमाणित आढळले. बियाण्यांच्या पिशव्यांवर बेस्ट क्वालिटी गॅरंटी, 100 टक्के समाधान असा दिशाभूल करणारा दावा केल्याचाही आरोप आहे. जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक सतीशकुमार दांडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जीवनावश्यक वस्तू अधिनियम, बियाणे कायदा व नियम तसेच बीएनएस कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. बियाण्याबाबत जिल्हाभरातून ३१० शेतक-यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या. तक्रारींची पडताळणी करताना बियाण्याच्या पिशवीवर बियाणे अस्सल सोन्याचे नाणे' असा दावा करण्यात आल्याचे आढळून आले. हा दावा बियाणे नियम १९६८ मधील नियम १० नुसार दिशाभूल करणारा असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून बियाण्याचे नमुने घेऊन महाबीजच्या बियाणे तपासणी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यापैकी आठ नमुन्यांचे अहवाल अप्रमाणित आढळल्याने कंपनीच्या बियाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. संबंधित वाण हे 'सत्यता दर्शक बियाणे' प्रकारातील असल्याने त्याच्या उत्पादन, पॅकिंग आणि सीलिंगची संपूर्ण जबाबदारी उत्पादक कंपनीवरच असल्याचे फिर्यादीत स्पष्ट करण्यात आले आहे. १० जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत या बियाण्यांची विक्री करण्यात आली असून, शेतकयांची दिशाभूल करून फसवणूक केल्याचा आरोप कंपनीवर ठेवण्यात आला आहे.

याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८, जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच बीएनएस कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# पूर्णा नदीत बुडून दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी १३ जुलै





**नांदुरा :** नांदुरा शहरातील वार्ड क्रमांक १ येथील दोन अल्पवयीन मुलांचा पूर्णा नदीत पाय घसरून पाण्यात बुडाल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (१२ जुलै) घडली. या घटनेमुळे संपूर्ण नांदुरा शहरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मृत मुलांमध्ये कृष्ण बाळू भोपळे (वय १४ वर्षे) आणि प्रतिक शिवलाल वानखेडे (वय १२ वर्षे) या दोघांचा समावेश असून, दोघेही नांदुरा शहरातील वार्ड क्रमांक १ येथील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुले पूर्णा नदी परिसरात गेली असताना त्यांचा पाय घसरून ते खोल पाण्यात पडले. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघांचाही पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.घटनेची माहिती मिळताच ओम साई फाउंडेशनच्या गोपाल फंड, उमेश पाखरे, विकास पाखरे, प्रद्युम्न पाखरे, राजू पाखरे, विलास निबोळकर, राहुल निमकडे आणि कृष्णा वसोकार या जलमित्र पथकाने अथक प्रयत्नांनंतर दोन्ही मुलांना नदीतून बाहेर काढून तातडीने नांदुरा येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

### जिल्ह्यात १० टक्के मतदारांचेच नाव 'डिजिटाईज'

**अकोला:** अकोल्यात सुरू असलेल्या 'विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण' म्हणजेच 'एसआयआर' मोहिमेदरम्यान अनेकांना अर्जच मिळाले नाहीत. जिल्ह्यातील सुमारे १६ लाख मतदारांपैकी आतापर्यंत केवळ १० टक्के मतदारांचेच 'डिजिटायझेशन' पूर्ण झाले आहे. ज्या भागांना आर्थिकदृष्ट्या मागास किंवा झोपडपट्टी म्हटले जाते, तिथे मतदार नोंदणीसाठी नागरिकांची अक्षरशः चढाओढ सुरू आहे. पण दुसरीकडे, स्वतःला सुशिक्षित, जागरूक आणि सक्षम समजणाऱ्या पांढरपेशा वस्त्यांमध्ये मात्र या प्रक्रियेबाबत कमालीची उदासीनता दिसते आहे. धक्कादायक बाब म्हणजे, जिल्ह्यातील सुमारे १६ लाख मतदारांपैकी आतापर्यंत केवळ १० टक्के मतदारांचेच 'डिजिटायझेशन' पूर्ण झाले

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135